www.rajdand.com
सातारा/पुणे, बुधवार
31.01.2024
पृष्ठ : ४ I मुल्य : ४ I माघ कृ १०
rajdandlive
Reg.No.MAHMAR/17902/1999

मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
स्थापना १९९९

२५ वर्षे विश्वासार्हतेची

# अशोक सराफ यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार

**मुंबई :** अशी ही बनवाबनवीसह मराठीतील असंख्य मराठी चित्रपट आणि नाटकांतून रसिकमनाचे मनोरंजन करणारे मराठीतील ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांना मानाचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. कला क्षेत्रातील भरीव योगदानासाठी २०२३ सालचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार अशोक सराफांना जाहीर झाल्यानंतर सर्व स्तरांतून त्यांचं कौतुक केलं जातंय. तसंच, रसिक मनाचे राजकारणी अशी ख्याती असलेल्या राज ठाकरे यांनीही अशोक सराफांचं अभिनंदन केलं आहे.



अशोक सराफ यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर झाला, त्याबद्दल अशोक सरांचे मनापासून अभिनंदन. मी मागे एकदा म्हणालो तसं, एकाच वेळेला सिनेमा, रंगभूमी आणि टीव्ही ह्या तिन्ही माध्यमांवर हुकूमत गाजवणारे चतुरस्त्र कलाकार ह्या देशाने खूप कमी पाहिले, अशोक सर त्यातले एक, अशा शब्दांत राज ठाकरेंनी अशोक सराफ यांचं अभिनंदन केलं.

मराठीत कलाकारांचा अजिबात तुटवडा नाही, पण आपल्या भाषेच्या सीमा ओलांडून एखादा नट देशव्यापी ओळखला जातोय किंवा त्यासाठी प्रयत्न करतोय असं दिसत नाही. पण अशोक सर ह्या बाबतीत देखील अपवाद ठरले. महाराष्ट्र भूषणसारखे राज्यातील सर्वोच्च नागरी पुरस्कार कलाकरांना ते उमेदीत असताना मिळावेत असं मला वाटतं. अर्थात हे प्रत्येक वेळेला होतंच असं नाही पण अशोक सरांच्या बाबतीत राज्य सरकारने योग्य टप्प्यावर त्यांचा उचित सन्मान केला ह्याबद्दल राज्य सरकारचं पण मनापासून अभिनंदह्, असंही ते म्हणाले.

मूळचे बेळगावचे असणाऱ्या अशोक सराफ यांचा जन्म मुंबईत झाला. दक्षिण मुंबईतील चिखलवाडी या भागात त्यांचे बालपण गेलं. गोपीनाथ सावकार हे त्यांचे मामा होत. अशोक सराफ यांचे शिक्षण मुंबईतील डी.जी.टी. विद्यालयात झाले. त्यांना सुरुवातीपासूनच नाटकांची अतिशय आवड होती. वयाच्या अठराव्या वर्षी त्यांनी शिरवाडकरांच्या ह्य ययाती आणि देवयानी ह्य या नाटकातील विदूषकाच्या भूमिकेद्वारा व्यावसायिक रंगभूमीवर पाऊल ठेवलं. काही संगीत नाटकांतूनदेखील त्यांनी भूमिका केल्या. त्यांची आजवरची लक्षात राहिलेली भूमिका म्हणजे अशीही बनवा बनवी या सिनेमातली धनंजय मानेची भूमिका आहे. तसंच 'पांडू हवालदार या सिनेमात त्यांनी दादा कोंडकेंसह अभिनय केला. तसंच राम राम गंगाराम या दोन चित्रपटांमध्ये दादा कोंडके यांच्यासह त्यांनी भूमिका केल्या. त्या दोन सिनेमांमधला अभिनयही लोकांच्या लक्षात आहे.

पुरस्कार मिळाल्यानंतर अशोक सराफ काय म्हणाले?

माझ्या मनात अत्यंत संमिश्र भावना आहेत. हा पुरस्कार मिळणं ही अत्यंत मानाची आणि आनंदाची गोष्ट आहे. आजवर ज्या थोर लोकांना हा पुरस्कार मिळाला आहे आज मला त्यांच्या बरोबरीने नेऊन बसवलं आहे ही माझ्यासाठी फार मोठी गोष्ट आहे. महाराष्ट्र भूषण हा महाराष्ट्राचा नंबर वन पुरस्कार आहे असं मी समजतो. गेली ५० वर्षं मी चित्रपट, नाटक, मालिका करतोय त्यातली मेहनत कुठेतरी सत्कारणी लागली अन प्रेक्षकांनीही त्याला दाद दिली त्याचा मला प्रचंड आनंद आहे, असं अशोक सराफ म्हणाले.

## मनोज जरांगे पाटील पुन्हा एकदा बेमुदत उपोषण करणार

### रायगडावरून सरकारला दिला इशारा

**रायगड :** मराठा समाजाला आरक्षण मिळावं म्हणून सगेसोयरे संदर्भात सरकारने काढलेल्या अधिसूचनेचं कायद्यात रुपांतर व्हावं. पुढील १५ दिवसांत विशेष अधिवेशन बोलावून हा कायदा पारीत करावा अशी मागणी मनोज जरांगे पाटलांनी केली आहे. मराठ्यांना सरसकट आरक्षण मिळालेलं नाही, अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली होती. यावरून मनोज जरांगे पाटलांनी आता सरकारला इशारा दिला आहे. आज रायगड येथे मनोज जरांगे पाटील गेले होते. छत्रपती शिवाजी महाराजांचे आशीर्वाद घेतल्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी पुन्हा एकदा बेमुदत उपोषणाला बसणार असल्याचं जाहीर केलं.





आज महाराष्ट्रातील मराठा समाजाला आणि सरकारला महत्त्वाचं सांगायचं आहे. मुख्यमंत्री आणि दोन्ही मुख्यमंत्र्यांना माझी विनंती आहे की सगेसोयऱ्यांची जी अधिसूचना काढली आहे, त्याची तातडीने अंमलबजावणी करायला पाहिजे. प्रमाणपत्र वाटपाला सुरुवात झाली पाहिजे. तुम्ही हरकती-सूचना मागितल्या असल्या तरी तातडीने अंमलबजावणी होणं आवश्यक आहेह्, असं मनोज जरांगे म्हणाले.

आज महाराष्ट्रातील मराठा समाजाला आणि सरकारला महत्त्वाचं सांगायचं आहे. मुख्यमंत्री आणि दोन्ही मुख्यमंत्र्यांना माझी विनंती आहे की सगेसोयऱ्यांची जी अधिसूचना काढली आहे, त्याची तातडीने अंमलबजावणी करायला पाहिजे. प्रमाणपत्र वाटपाला सुरुवात झाली पाहिजे. तुम्ही हरकती-सूचना मागितल्या असल्या तरी तातडीने अंमलबजावणी होणं आवश्यक आहेह्, असं मनोज जरांगे म्हणाले.

पुढील १५ दिवसांत विशेष अधिवेशन बोलावून सगेसोयऱ्यांच्या अधिसूचनेचं कायद्यात रुपांतर करा. तसंच, तातडीने उद्यापासून या अधिसूचनेची अंमलबजावणी सुरू नाही केली तर १० फेब्रुवारीला बेमुदत उपोषण सुरू करण्याचा निर्णय घेतला आहेह्, असा इशारा मनोज जरांगे पाटलांनी दिला आहे.

या कायद्याची अंमलबजावणी वेळेत केली नाही किंवा दडपणाखाली जबाबदारी पार पाडली नाही तर आम्हाला पुन्हा अडचणीचे दिवस यायला नको. नोंदी मिळत नाहीत, समितीला मुदतवाढ दिलेली असतानाही समिती काम करत नाही. ज्यांची कुणबी नोंद मिळाली त्यांना प्रमाणपत्र वाटप होणं आवश्यक आहे. त्यामुळे आपण १० फेब्रुवारीचा निर्णय घेतलेला आहे, अशी घोषणा मी रायगडाच्या पायथ्याशी करत आहेह्, असंही जरांगे पाटील म्हणाले.

**अद्यापही गुन्हे मागे नाहीत**

चार दिवस उलटून गेले तरी आंतरवाली सराटीसह महाराष्ट्रातील मराठा बांधवांवरील गुन्हे मागे घेतलेले नाहीत. तुम्ही तत्काळ शब्द वापरला आहे. सरकारकडून वेगवेगळे स्टेटमेंट येत आहेत. त्यामुळे सरकारची भूमिका आम्हाला कळत नाही. त्यामुळे १० फेब्रुवारीच्या आत गुन्हे मागे घ्यावेह्, असा इशाराही जरांगे पाटलांनी दिला.

**हैदराबादचं गॅझेट स्वीकारावं**

हैदराबादचे १८८४ चं गॅझेट चार दिवस उलटूनही स्वीकारलं नाही. रायगड चढतानाही मी याची माहिती घेत होतो. परंतु, अद्यापही हे गॅझेट स्वीकारण्यात आलेलं नाही. हे गॅझेट स्वीकारून त्याला शासकीय नोंदीचा दर्जा दिला पाहिजे. बॉम्बे गव्हर्मेंटचं गॅझेट स्वीकारलं नाही. १८८४ ची जनगणनाही स्वीकारावी. कारण शिंदे समितीकडे ते देणं आवश्यक आहे. १९०२ चा दस्तावेज घेतलेला नाही. ओबीसी आयोगाचा अहवाल जाणं महत्त्वाचा आहे.

**अधिसूचना टिकवण्याची जबाबदारी सरकारची**

सगेसोयरेबाबत राजपत्रित अधिसूचना दिली आहे. ही अधिसूचना टिकवण्याची जबाबदारी सरकारची आहे. कारण, सरकार आम्हाला सांगतं की ते टिकवलं जाणार आहे, असंही ते म्हणाले.

## २० फेब्रुवारीला ओबीसींची सभा

**मुंबई :** मराठा समाजाच्या आरक्षणाला विरोध नाही, परंतु सगेसोयऱ्यांच्या नावाने सरसकट कुणबी प्रमाणपत्रे देण्यासाठी अधिसूचना काढण्याचा राज्य सरकारचा निर्णय ओबीसींवर अन्याय करणारा आहे, त्याला विरोध करण्यासाठी पुढील महिन्यात २० फेब्रुवारीला छत्रपती संभाजीनगर येथे ओबीसींची विराट सभा घेण्यात येईल, अशी माहिती विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी दिली.



राज्यातील मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी राज्य शासनाने २६ जानेवारी रोजी कुणबी नोंदींवर आधारित सरसकट कुणबी म्हणून जातीची प्रमाणपत्रे देण्यासंदर्भात हरकती व सूचना मागविणारी अधिसूचना काढली आहे. त्याला सर्वप्रथम अन्न व नागरीपुरवठामंत्री छगन भुजबळ यांनी विरोध केला. त्यांनी ओबीसी संघटनांची बैठक बोलावून, या अधिसूचनेच्या विरोधात आंदोलन करण्याची घोषणा केली. ओबीसींवर अन्याय करणारी ही अधिसूचना रद्द करावी, या मागणीसाठी १ फेब्रुवारीला राज्यातील सर्व खासदार व आमदारांच्या घरांसमोर आंदोलन केले जाईल, त्याचबरोबर अहमदनगर येथे ओबीसींचा जाहीर मेळावा घेण्यात येईल, अशी घोषणा भुजबळ यांनी केली आहे.

या अधिसूचनेच्या विरोधात आता काँग्रेस नेते वडेट्टीवारही मैदानात उतरले आहेत. मंगळवारी त्यांनीही विविध ओबीसी संघटनांच्या प्रतिनिधींची बैठक घेतली. त्यात या अधिसूचनेला विरोध करण्याचा निर्णय घेण्यात आला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ही अधिसूचना काढली आहे. यामुळे ओबीसी समाजावर अन्याय झाला असून, त्याला विरोध करण्यासाठी येत्या २० फेब्रुवारीला संभाजीनगर येथे ओबीसींच्या विराट सभेचे आयोजन करण्यात आले आहे, असे वडेट्टीवार यांनी सांगितले.

## लोणावळ्यात अन्नातून विषबाधा झाल्याने १४६ बकऱ्यांचा मृत्यू



**लोणावळा :** वाकसई, देवघर, करंडोली, जेवरेवाडी गावाच्या वरील बाजूला असलेल्या डोंगर भागात बकऱ्या चारणाऱ्या एकाच्या बकऱ्यांच्या खाण्यात काहीतरी आल्याने रविवारी मध्यरात्रीनंतर सोमवारी सकाळपर्यंत जवळपास १४६ बकऱ्यांचा मृत्यू झाला. काळुराम शिवाजी बरकडे (मु. वनकुट ता. पारनेर जि. नगर) हे आपल्या बकऱ्यांचा वाडा घेऊन वाकसई, देवघर, करंडोली, जेवरेवाडी, वेहेरगाव, वरसोली या ठिकाणी शेतात बसतात आणि आपला उदरनिर्वाह करतात.

रविवारी त्यांच्या बकऱ्यांच्या खाण्यात काहीतरी आल्याने मध्यरात्रीनंतर त्यांना त्रास होऊ लागला. त्यामध्ये त्यांचा मृत्यू झाला. याबाबत त्यांनी गावात कळवल्यानंतर गावातील नागरिकांनी तत्काळ मदतीसाठी मावळ तालुका पशू वैद्यकीय अधिकारी यांना बोलावून घेतले. वैद्यकीय पथकाने मागील दोन दिवस बकऱ्या वाचवण्यासाठी प्रयत्न केले. अचानक मोठ्या प्रमाणात बकऱ्या मरण पावल्याने धनगर बंधूवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. शासनाने याची दखल घेत नुकसानग्रस्त पशुपालकाला शासकीय पातळीवरून नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी केली जात आहे. तसेच करंडोली आणि आजूबाजूच्या भागातील नागरिकांनी मदतीचा हात पुढे करत नुकसानग्रस्ताला मदत करण्याचे आवाहन केले आहे.

## खुल्या प्रवर्गातील सर्वेक्षणाला २ फेब्रुवारी पर्यंत मुदतवाढ




**पुणे :** महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगामार्फत मराठा समाजाचे सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक मागासलेपण तपासण्यासाठी सर्वेक्षण करण्यात येत आहे. या सर्वेक्षणाचा कालावधी बुधवारपर्यंत (३१ जानेवारी) होता. मात्र, काही ठिकाणी सर्वेक्षणास आणखी कालावधीची आवश्यकता असल्याने या सर्वेक्षणासाठी २ फेब्रुवारी २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत असल्याची माहिती आयोगाकडून मंगळवारी देण्यात आली.

आयोगाच्या वतीने प्रगणकांना सर्वेक्षणासाठी ओळखपत्र उपलब्ध करून देण्यात आली आहेत. सर्वेक्षणादरम्यान केवळ मराठा समाज, खुल्या प्रवर्गातील कुटुंबाची माहिती मोबाइल उपयोजनमधील (ॲप) प्रश्नावलीद्वारे भरून घेतली जात आहे. कुटुंब आरक्षित प्रवर्गातील असल्याची माहिती प्रगणकाला मिळाल्यानंतर त्या कुटुंबाची पुढील माहिती घेतली जात नाही. सर्वेक्षणाचा कालावधी कमी असल्याने प्रगणक सकाळी लवकर अथवा सायंकाळी उशिरा सर्वेक्षणासाठी येऊ शकतात. नागरिकांनी सर्वेक्षणासाठी नियुक्त प्रगणकांना आवश्यक माहिती देऊन सर्वेक्षणास सहकार्य करावे, असे आवाहन आयोगामार्फत करण्यात येत आहे.

## साहाय्यक आयुक्तांची तडकाफडकी उचलबांगडी

**कल्याण :** कल्याण डोंबिवली पालिका हद्दीतील बेकायदा बांधकामांच्या विषयावरून उच्च न्यायालय संतप्त झाले असताना पालिका हद्दीतील काही साहाय्यक आयुक्त बेकायदा बांधकामांवर कारवाई करण्यात फुटकळ कारणे देऊन टाळाटाळ करत असल्याचे निदशर्नास आल्याने आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी सोमवारी शासन सेवेतून आलेल्या तीन महिला साहाय्यक आयुक्तांच्या प्रभागातून तडकाफडकी बदल्या केल्या.

या अधिकारी महिला बेकायदा बांधकामांवर कारवाई करत नसल्याच्या वाढत्या तक्रारी आयुक्त डॉ. जाखड यांच्यापर्यंत आल्या होत्या. शासन सेवेतून आलेल्या महिला अधिकारी पालिकेत आणि प्रभागात नवीन असल्याने त्या प्रभागांमध्ये कोणत्याही प्रकारचा दबाव न घेता कठोरपणे काम करतील. प्रभागातील बेकायदा रोखण्यात महत्वाची भूमिका बजावतील त्यामुळे त्यांना प्रभागांमध्ये साहाय्यक आयुक्त पदावर नियुक्त करावे, अशी मागणी वास्तुविशारद संदीप पाटील, इतर नागरिकांना तत्कालीन आयुक्त डॉ. भाऊसाहेब दांगडे यांच्याकडे गेल्या वर्षी केली होती.

तत्कालीन आयुक्तांनी स्नेहा करपे, सोनम देशमुख, प्रीती गाडे यांना ह, ग आणि अ प्रभागात नियुक्ती दिली होती. जिल्हा नियोजन विकास समितीकडून आलेल्या साहाय्यक आयुक्त निवेदिता पाटील यांनी वेळोवेळी राजकीय दबाव आणून प्रभागात काम करण्यास नकार दिल्याच्या तक्रारी आहेत. याऊलट आयुक्तांवर एका लोकप्रतिनिधीच्या स्वीय साहायकाचा दबाव आणून चांगली पदस्थापना मिळविण्यात त्या सतत प्रयत्नशील असल्याची पालिकेत चर्चा आहे.

ग प्रभागात यापूवी कठोर काम करणाऱ्या करपे यांची बेकायदा बांधकामांचे आगर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या डोंबिवली पश्चिमेत ह प्रभागात साहाय्यक आयुक्त म्हणून नियुक्ती होती.

## व्हिडीओ कॉल अन महिलेच्या नावावर १९ लाखांचे कर्ज

**पिंपरी :** तैवानला पाठविलेले पार्सल मुंबईत नार्कोटिक्स विभागाने पकडले आहे. त्याची पडताळणी करण्यासाठी नार्कोटिक्स विभागाला फोन जोडल्याचे सांगून महिलेला स्काईपवरून व्हिडीओ कॉल करण्यात आला. महिलेला बँकेचे उपयोजन चालू करण्यास सांगितले. त्याद्वारे महिलेच्या नकळत १९ लाखाचे कर्ज मंजूर करून ती रक्कम वळती करून घेत फसवणूक केली.

महिलेने वाकड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. मोबाईल धारक आकाश कुमार, अमनी कोंडाल, कर्ज वळती करून घेतलेले बँक खातेधारक यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी महिलेला आकाश नावाच्या व्यक्तीने फोन करुन तैवानमध्ये पाठवलेले पार्सल मुंबई येथील नार्कोटीक्स विभागामध्ये अडकले असल्याचे सांगितले. फोन नार्कोटिक्स विभागाला जोडत असल्याचे सांगून महिलेचे बँक खाते तपासायचे आहे, असे सांगितले.महिलेला स्काईपवरून व्हिडिओ कॉल करून त्यांची कागदपत्रे व बँक खात्याची माहिती घेतली. महिलेला बँकेचे उपयोजन उघडायला लावून त्यांच्या नकळत १९ लाख ४ हजार रुपयांचे वैयक्तिक कर्ज काढले. पैसे महिलेच्या खात्यावर येताच त्यांनी बेनिफिशरी बँक खात्यावर वळती करून घेतले. पोलीस निरीक्षक साळुंखे तपास करीत आहेत.

## वाहतुकीचा नियम मोडणाऱ्या वाहनचालकांचा परवाना होतोय रद्द

**पुणे :** शहरातील वाहतुकीची शिस्त दिवसेंदिवस बिघडत आहे. त्यामुळे नियम न पाळणाऱ्या वाहनचालकांचा परवाना निलंबित करण्याचे पाऊल उचलण्यात आले आहे. गेल्या वर्षी एक हजारहून अधिक वाहनचालकांचे परवाने ३ ते ६ महिन्यांपर्यंत निलंबित करण्यात आले आहेत. दररोज सरासरी तीन वाहनचालकांवर ही कारवाई झाली आहे.

वाहतूक पोलीस आणि प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून (आरटीओ) ही कारवाई झाली आहे. वाहतुकीच्या नियमांचा वारंवार भंग करणाऱ्या वाहनचालकांची यादी वाहतूक पोलिसांकडून आरटीओला पाठविली जाते. या वाहनचालकांचा परवाना निलंबित करावा, अशी शिफारसही करण्यात येते. पोलिसांनी पाठविलेल्या प्रस्तावावर आरटीओकडून दर महिन्याच्या अखेरीस कारवाई केली जाते. त्यात पोलिसांनी दिलेल्या गुन्ह्यानुसार वाहनचालकांचा परवाना तीन ते सहा महिन्यांपर्यंत निलंबित केला जातो.

गेल्या वर्षी आरटीओकडून १ हजार ३ वाहनचालकांचे परवाने निलंबित करण्यात आले. मद्यप्राशन करून वाहन चालविणे, अतिवेगाने वाहन चालविणे, सिग्नल तोडणे, हेल्मेट न परिधान करणे, वाहन चालविताना मोबाइलवर बोलणे, क्षमतेपेक्षा जास्त मालाची वाहतूक, क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी वाहतूक या नियमांचा भंग करणाऱ्या वाहनचालकांवर ही कारवाई केली जाते. आरटीओकडून परवाना निलंबित करण्यात आल्याची माहिती संबंधित वाहनचालकाला ऑनलाइन दिली जाते. परवाना निलंबनाच्या कालावधीत चालक वाहन चालविताना आढळल्यास त्याच्यावर पाच हजार रुपयांची दंडात्मक कारवाई करून त्यांचे वाहनही जप्त केले जाऊ शकते.

**२०२३ मध्ये शहरातील परवाना निलंबन**

सिग्नल तोडणे : २२२, वाहन चालविताना मोबाइलवर बोलणे : १५३, अतिवेगाने वाहन चालविणे : १७०, मद्यप्राशन करून वाहन चालविणे : १४१, दुचाकीवर ट्रिपल सीट : २८२, एकूण कारवाई : १००३

**परवाना निलंबनाचा कालावधी**

**३ महिने :** अतिवेगाने वाहन चालविणे, सिग्नल तोडणे, हेल्मेट न परिधान करणे, वाहन चालविताना मोबाइलवर बोलणे, क्षमतेपेक्षा जास्त मालाची वाहतूक, क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी वाहतूक, ट्रिपल सीट

**६ महिने : मद्यप्राशन करून वाहन चालविणे**

बेशिस्त वाहनचालकांवर परवाना निलंबनाची कारवाई केली जाते. निलंबनाचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर वाहनचालकांना पुन्हा वाहन चालविता येते. यात केवळ मद्यप्राशन करून वाहन चालविण्याच्या गुन्ह्याचा अपवाद आहे. त्यांना वाहनाची तंदुरुस्ती तपासणी आणि वाहन चालविण्याची चाचणी पुन्हा द्यावी लागते. त्यानंतर त्यांना पुन्हा परवाना मिळू शकतो.

**- संजीव भोर,** प्रभारी प्रादेशिक परिवहन अधिकारी

वाहतूक नियमांचा वारंवार भंग करणाऱ्या वाहनचालकांवर अंकुश राहावा, यासाठी परवाना निलंबित करण्याची शिफारस वाहतूक पोलिसांनी आरटीओकडे केली होती. तीन ते चार वेळा नियमभंग करणाऱ्यांवर ही कारवाई प्रामुख्याने करण्यात आली आहे. परवाना निलंबित झाल्यानंतर संबंधित व्यक्तीला त्या कालावधीत वाहन चालविता येत नाही.

**-शशिकांत बोराटे,** पोलीस उपायुक्त, वाहतूक शाखा

## प्राध्यापक भरती प्रक्रिया लांबणीवर; अर्जांसाठी १६ फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विविध विभागांमधील प्राध्यापकांच्या १११ पदांसाठी भरती प्रक्रिया राबवली जात आहे. या प्रक्रियेत सामाजिक व समांतर आरक्षणाच्या अध्यादेशाच्या अंमलबजावणीसाठी त्यात काही दुरुस्ती करण्यात आली आहे. त्यामुळे प्राध्यापक भरतीसाठी अर्ज करण्यास मुदतवाढ देण्यात आली असून. उमेदवारांना येत्या १६ फेब्रुवारीपर्यंत अर्ज करता येणार आहे. त्यामुळे भरती प्रक्रिया काही दिवस लांबणीवर पडणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

विद्यापीठाने प्राध्यापक भरतीसाठी अर्ज प्रक्रिया सुरू करून अर्जांसाठी ३० जानेवारीपर्यंतची मुदत दिली होती. मात्र राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडून २५ जानेवारीला समांतर आरक्षणासंदर्भातील अध्यादेश प्रसिद्ध करण्यात आला. समांतर आरक्षणामध्ये ३० टक्के महिला आरक्षण, ४ टक्के दिव्यांग, ५ टक्के खेळाडू आदी आरक्षणाबाबत स्पष्टता आहे. त्यानुसार भरती करताना सामाजिक आणि समांतर आरक्षणाची काटेकोर अंमलबजावणी करणे आवश्यक असल्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर विद्यापीठाच्या भरती प्रक्रियेत सामाजिक आणि समांतर आरक्षणाची अंमलबजावणी करावी लागणार असल्याने काही बदल करावे लागणार आहेत. त्यामुळे भरती प्रक्रियेत उमेदवारांना अर्ज करण्यासाठी मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला. आता उमेदवारांना १६ फेब्रुवारीपर्यंत ऑनलाइन अर्ज करता येणार आहे, तर अर्जाची प्रत २९ फेब्रुवारीपर्यंत सादर करता येणार असल्याची माहिती विद्यापीठाकडून देण्यात आली. त्यामुळे भरती प्रक्रिया पुन्हा काही दिवस लांबणीवर पडल्याचे दिसून येत आहे.

# महात्मा गांधी आपल्याला खरंच कळले आहेत का?

**पंकज चव्हाण**

बाबा आमटे गांधीजींविषयी म्हणत, ह्यचुका सगळ्यांकडून होतात फक्त लोक त्या कबूल करत नाहीत. या माणसानेही चुका केल्या फरक इतकाच की त्याने त्या जगासमोर कबूल केल्याह्ल एखाद्या महापुरुषाचे यश हे त्याच्या मृत्यूनंतर त्याचे विचार किती लोकांपर्यंत पोहचले आणि काळानुरूप ते किती आत्मसात केले गेले, यावर अवलंबून असते. गांधीजी पहिल्या निकषानुसार जगात पहिल्या क्रमांकाचे मानकरी! पण दुसऱ्या निकषावर काठावर पास. कारण महान व्यक्ती त्यांच्या आयुष्यात जे कार्य करतात हे झाले त्याचे कर्तृत्व आणि मृत्यूनंतर जे कार्य उरते, ती असते अनुयायांची जबाबदारी. महानता नापास होते ती नाकर्त्या अनुयायांमुळेच. कारण सरकारी कचेरीतील भिंती सजवण्यासाठी, स्वच्छतेच्या अभियानासाठी, राजकीय फायद्यासाठी आणि परदेशी पाहुण्यांना भेटवस्तू देण्यासाठी या गोष्टी सोडल्या तर गांधीजी हा विचार नसून फक्त एक व्यक्ती किंवा वस्तू (भेटवस्तू) आहे असेच सगळ्यांना वाटते. ज्या व्यक्तीचे आणि ज्याच्या विचारांचे जगाला आकर्षण आहे, त्याचा आपल्याच काही देशवासीयांना तिटकारा आहे. एवढेच नव्हे, तर त्यांच्या हत्येचे समर्थन करणारे सुद्धा आहेत. आपल्या महान लोकशाहीतील अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा यापेक्षा वेगळा पुरावा कोणता असू शकतो.

एका बनिया व्यापारी कुटुंबात जन्म, मध्यमवगीय कुटुंबातील बालपण, बालविवाह, परदेशात वकिलीचे शिक्षण अन् भारतात परतल्यानंतर वकिली व्यवसायातील अपयश, अफ्रिकेत संधी, काळा गोरा भेदभाव अन् पुढे अपमान हीच लढ्याची प्रेरणा मानून समानतेसाठी लढा असा गांधीजींचा इथवरचा जीवन प्रवास. पण महात्मा होण्याची सुरुवात झाली, ती भारतात परतल्यानंतर. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत गांधीजींचा सहभाग १९१५ नंतरचा. त्या आधी दक्षिण आफ्रिकेत भारतीयांना वसाहतीमध्ये स्थायिक होण्याचा, व्यवसाय करण्याचा, स्थावर मालमत्ता खरेदी करण्याचा आणि मतदान करण्याचा अधिकार मिळावा म्हणून गांधीजींनी सत्याग्रहाच्या मार्गाने लढा दिला. हे जे सत्याग्रह नावाचे तंत्र (शस्त्र) होते त्याचा गांधीजींनी तेथेच पहिल्यांदा उपयोग केला. सरकारने लादलेले अनिष्ट कायदे मोडायचे आणि स्वतःला अटक करवून घ्यायची. वर आपल्या गुन्ह्याची कबुलीही द्यायची आणि आपल्याला जास्तीत जास्त शिक्षा करावी अशी न्यायाधिशांना विनंतीही करायची. (हे जरा अजबच नव्हे का?) हे सर्व सत्याग्रहींनी करायचे आणि वकिल हवा असेल तर गांधींजी होतेच. असा एकमेव वकील जो आपल्या अशिलाचा गुन्हा सिद्ध करण्यासाठी आणि त्याला जास्तीत जास्त शिक्षा व्हावी म्हणून लढत असेल. म्हणूनच त्यावेळच्या राष्ट्रीय काँग्रेसमधील उच्चशिक्षित आणि यशस्वी वकिलांना हा माणूस पहिल्यांदा विचित्रच वाटला. मात्र एका चळवळीत लाखो लोक सामावून जातात पण एक व्यक्ती अख्खी चळवळ आपल्यात सामावून घेते, याचा प्रत्यय जेव्हा त्यांना आला तेव्हा या अर्धनग्न फिकिरला शरण जाण्याखेरीज त्यांच्याकडे पर्याय उरला नाही. अनेकांनी विरोध केला, चळवळीतून बाहेर पडले पण या अर्धनग्न फकिराचे जनसाम्राज्य वाढतच गेले.

भारतीय स्वातंत्र्याची चळवळ राष्ट्रीय काँगेसच्या पातळीवर तोपर्यंत उच्चविद्याविभूषित आणि विशिष्ट वर्गापुरतीच सीमित होती. गांधीजींनी तिला सामान्य लोकांपर्यंत पोहचवले. आपल्या न्याय्य हक्कांसाठी आपल्याला स्वतः संघर्ष करावा लागेल प्रसंगी शिक्षा भोगावी लागेल हा विचार आणि आदर्श गांधीजींनी जनसामान्यांसमोर ठेवला. असहकार आंदोलन, सविनय कायदेभंग, दांडी यात्रा, चले जाव अशा अनेक आंदोलनातून ब्रिटिश सत्तेवर दबाव आणला. जरी या आंदोलनांचे यश अपयश अनेक निकषांवर जोखले गेले, तरी गांधीजींचे उपोषण आणि आंदोलनाकडे ब्रिटिशांना दुर्लक्ष करता आले नाही, हेच या यशाचे द्योतक आहे.

हिंदू- मुस्लीम ऐक्यासाठी आणि देशाच्या अखंडतेसाठी जेवढे प्रयत्न गांधीजींनी केले तेवढे क्वचितच कुणी केले असतील. बाकीच्यांनी अखंडतेची फक्त स्वप्ने पाहिली आणि आपल्याच धर्मांध वृत्तीने देशाच्या विभागणीची बिजेही रोवली. इथेच न थांबता गांधीजींचा बळी घेऊन त्याचे खापरही त्यांच्याच माथी मारले आणि या देशाचे तुकडे गांधींमुळेच झाले, असा समज निर्माण केला. पण सत्य हे आहे की हा देश अखंड ठेवण्याच्या प्रयत्नांतील जो सर्वात मोठा दुवा होता तो तथाकथित धर्मांध आणि अविचारी लोकांमुळे कायमचा तुटला. गांधीजींची शांतता, संतता आणि अहिंसा ही धर्मांधता आणि कट्टरतेला पराभूत करू शकली नाही. स्वातंत्र्याच्या पहाटेला फाळणीचा जो काळोख पसरला त्यात लाखो निरपराधांचा बळी गेला. इतिहासात डोकावून पाहिले तर कळेल की लोकांचे प्राण वाचवण्यासाठी कोण प्रयत्नशील होते आणि कोण दंगलींमध्ये सहभागी होते. हजारोंचे बळ आपल्याकडे असतानासुद्धा दंगल शांत करण्यात गांधींजीच सरस ठरले (आजच्या भाषेत वन मॅन आमी) हे माऊंटबॅटन यांचे उद्गार गांधीजींच्या प्रयत्नांच्या परकाष्ठेची साक्ष देतात.

गांधीजींनी केलेली राष्ट्रीय नेतृत्वाची निवड ही चूक होती असाही एक प्रवाह (आता लाट) आहे आपल्याकडे. सर्वाधिक प्रांतिक सरकारांनी सरदार वल्लभभाई पटेलांच्या बाजूने कौल दिला, हे सत्यही आहे. पण सरदारांच्या उपस्थितीत आणि सहमतीने त्यांनी नेहरूंची निवड केली. सरदार पटेलांच पोलादी व्यक्तिमत्त्व पाहता अयोग्य निवडीला त्यांनी विरोध केला नसता, असे वाटत नाही. नुकत्याच स्वातंत्र्य झालेल्या अस्थिर राष्ट्राला दीघर्काळापर्यंत धोरणांची आखणी आणि अंमलबजावणी करू शकेल, असे नेतृत्त्व मिळावे, असा गांधीजींचा यामागचा विचार असावा. सरदार पटेल यांची तेव्हाची शारीरिक स्थिती पाहता, त्यांना दीघर्काळ नेतृत्त्व करता येणे कठीण होते. स्वातंत्र्यानंतर काही काळातच- १९५०मध्ये पटेल यांचे निधन झाले.

नेहरू आणि पटेल यांचे वैचारिक मतभेद होते, हे खरेच. गोष्टी राजीनाम्यापर्यंतही गेल्या पण दोघांनीही गांधीवाद सोडला नाही. इतिहास जर तर वर अवलंबून नसतो. तो घडलेल्या घटनांचा साक्षीदार असतो. आपल्यावर अन्याय झाला किंवा गांधीजींचा निर्णय चुकला हे असे सरदार पटेल यांनाही वाटले नाही. त्यामुळे ह्यसरदार वल्लभभाई पटेल हे पंतप्रधान झाले असते तर?ह्ल हा प्रश्न केवळ राजकारणाची पोळी भाजण्यासाठी निर्माण केलेला प्रश्न आहे.

कोणत्याही व्यक्तीच्या कार्याचा प्रभाव सर्वच क्षेत्रात समान नसतो. राजकीय स्वातंत्र्य मिळवताना गांधीजींचे व्यक्ती स्वातंत्र्य आणि सामाजिक समता प्रस्थापित करण्याकडे दुर्लक्ष झाले किंवा वर्णव्यवस्था नैसर्गिक आहे हा त्यांचा दृष्टिकोन त्यासाठी प्रतिकूल ठरला असावा. त्यामुळे सामजिक अन् आता राजकीय स्तरावर (खासकरून फेसबुक आणि व्हॉट्सॲप युनिव्हसिटीमध्ये) निर्माण केलेला प्रश्न म्हणजे महात्मा गांधीजी श्रेष्ठ की बाबासाहेब आंबेडकर? याचे तर्काधारीत उत्तर म्हणजे प्रत्येक व्यक्ती राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक या विषयांमध्ये आपली भूमिका पार पाडत असते. कोणीही सर्वच क्षेत्रांत पारंगत असत नाही. गांधीजींनी संपूर्ण आयुष्य भारतीय स्वातंत्र्य चळवळीला समर्पित केले आणि बाबासाहेबांनी सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी जीवन समर्पित केले. एकाने राजकीय स्वातंत्र्य श्रेष्ठ मानले आणि दुसऱ्याने सामाजिक स्वातंत्र्य. आता स्वातंत्र्य संग्रामाच्याचा निकष लावला तर गांधीजी श्रेष्ठ आणि सामाजिक समतेच्या लढ्याचा निकष लावला तर बाबासाहेब श्रेष्ठ!! तसे तर दोघेही श्रेष्ठच. पण आपण विवेकवादी विचार न करता मत मांडतो आणि महापुरुषांची वाटणी करतो. त्यामुळे कोणाचीही महानता ठरवताना आधी त्या व्यक्तीने आपले आयुष्य कोणत्या क्षेत्रासाठी समर्पित केले आहे ते पाहिले तर सोपे होईल. दोघांचीही महानता कालातीत आहे. त्यामुळे महापुरुषांची तुलना करताना गफलत नको.

पूर्वी ग्रामीण भागांतील शाळांत घोषणा दिली जायची ह्यएक रुपया चांदीचा, सारा देश गांधींचा.ह्ल (आजही देतात) एक हिंदी गीत ही आहे ह्यदेदी हमे आझादी बिना खड्ग बिना ढाल, साबरमती के संत तूने कर दिया कमालह्ल अशा कित्येक ओळी आहेत, ज्या गांधीजींची महानता अधोरेखित करतात. सारासार विवेकबुद्धी असलेली, कोणताही राजकीय स्वार्थ नसलेली व्यक्ती हे सांगू शकेल की याचा संबंध इतिहासाची मोडतोड करण्यासाठी किंवा इतर क्रांतिकारक आणि हुतात्म्यांचे बलिदान नाकारण्यासाठी नाही, तर हा कवीच्या अतिशयोक्तीचा नमुना आहे.

# कल्याण लोकसभेत रंगणार 'खासदार क्रीडासंग्राम'

**कल्याण :** कल्याण लोकसभा मतदारसंघातील खेळाडूंना विविध खेळांमध्ये आपली प्रतिभा दाखवता यावी यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेबांच्या मार्गदर्शनाखाली आणि कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ.श्रीकांत एकनाथ शिंदे यांच्या पुढाकारानें " खासदार क्रीडासंग्रामाचे " येत्या ४ ते १२ फेब्रुवारी दरम्यान आयोजन करण्यात आले आहे. विविध मान्यवर मंडळींच्या उपस्थितीत ४ फेब्रुवारीला डोंबिवलीतील वै. ह.भ.प. सावळाराम महाराज क्रिडा संकुलात दिमाखदार उद्घाटन सोहळा संपन्न होणार आहे. यामध्ये १५ हून अधिक खेळांचा समावेश असून कुस्ती, मल्लखांब यांसारख्या पारंपरिक खेळांचा देखील समावेश असणार आहे. तर यातील खेळाडूंना पन्नास लाखांहून अधिक रुपयांच्या रोख रकमेची पारितोषिके दिली जाणार आहेत.

कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे यांनी उपक्रमाबाबतची माहिती देण्यासाठी मंगळवारी ठाण्यातील दादाजी कोंडदेव स्टेडियम येथे पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. यावेळी त्यांनी ही माहिती दिली. सद्यस्थितीत या उपक्रमात वीस हजारहून अधिक नोंदणी झाल्या असून आधी खेळाडूंनी यात सहभाग घ्यावा असे खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे यांनी यावेळी आवाहन केले.

कल्याण लोकसभा मतदारसंघातील विविध शहरांमध्ये या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या क्रीडा स्पर्धांमध्ये सहभाग घेण्यासाठी इच्छुक स्पधर्कांना "khasdarkridasangram@gmail.com " यावर नोंदणी करता येत आहे. याच बरोबर फॉर्मद्वारे नोंदणी करण्याची देखील सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या स्पर्धेचे फॉर्म ठाणे येथील दादोजी कोंडदेव स्टेडियमच्या कार्यालयातून सकाळी ११ ते सायंकाळी ७ या वेळेत स्पधर्कांना मिळत आहेत. या क्रीडा संग्रामात मतदारसंघांतील खेळाडूंनी मोठया संख्येने सहभाग नोंदविण्याचे आवाहन खासदार डॉ.शिंदे यांच्या वतीने करण्यात आले आहे.





कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून मतदारसंघातील नागरिकांसाठी नियमित स्वरूपात विविध सांस्कृतिक कार्यक्रम तसेच सामाजिक उपक्रम राबविण्यात येत असतात. याच पाश्वर्भूमीवर खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या वतीने कल्याण लोकसभा मतदारसंघातील खेळाडूंसाठी विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. येत्या ४ ते १२ फेब्रुवारी या कालावधीत मतदारसंघातील विविध शहरांमध्ये या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

या १५ खेळांचा आहे समावेश

क्रिकेट, बॅडमिंटन, टेबल टेनिस, मल्लखांब - जिमनॅस्टिक, चेस, रायफल शूटिंग, खो-खो, स्विमिंग, कबड्डी, फुटबॉल कॅरम, ॲथलेटिक्स, बॉक्सिंग, रेसलिंग, टग ऑफ वर या खेळांचा यात समावेश करण्यात आला आहे.

मतदारसंघात याठिकाणी होणार स्पर्धा...

या क्रीडा संग्रामाचा भव्य आणि दिव्य उद्घाटन सोहळा डोंबिवलीच्या ह.भ. प. संतश्रेष्ठ श्री सावळाराम महाराज क्रिडा संकुलात होणार असून इतर स्पर्धा या मुंब्र्यातील मौलाना अब्दुल कलाम आझाद स्टेडियम, पलावा स्टेडियम, स्काय प्लाझा डोम हॉल उल्हासनगर, अंबरनाथ रायफल अँड पिस्टोल शूटिंग रेंज याठीकाणी होणार आहेत. तर दिवा, कळवा, डोंबिवली पुर्व पश्चिम, कल्याण पूर्व, कल्याण ग्रामीण, उल्हासनगर आणि अंबरनाथ या ८ ठिकाणी बॉक्स क्रिकेट स्पर्धा होणार आहेत.

### उद्घाटन सोहळ्याचे आकर्षण...

आकर्षक लाईट आणि लेझर शो, नयनरम्य फटाक्यांच्या आतिषबाजीमध्ये सर्व खेळांच्या ट्रॉफिंचे अनावरण, आंतरराष्ट्रीय दर्जाची जिमनॅस्टिकची प्रात्यक्षिके, मल्लखांब प्रात्यक्षिके, खासदार क्रिडा संग्राम स्पर्धेचे थीम साँगचे ॲक्रोबॅट नृत्याच्या माध्यमातून लॉन्चिंग, शिवकालिन खेळ, कलारी पायटू प्रात्यक्षिके या उदघाटन सोहळ्याचे आकर्षण असणार आहे.

### रंगणार विशेष स्पर्धा

या क्रीडासंग्रामात प्रशासकीय अधिकारी, राजकीय मंडळी, सेलिब्रिटी, यांचे विशेष सामने देखील भरविले जाणार आहेत.

### पारंपरिक खेळांचा समावेश

खासदार क्रीडा संग्रामात कुस्ती आणि मल्लखांब यांसारख्या पारंपारिक खेळांचा देखील समावेश करण्यात आला आहे. यामध्ये मॅट आणि मातीतील कुस्ती अशा दोन्ही पद्धतीचे कुस्ती स्पर्धा भरविल्या जाणार आहेत. ती स्पर्धेची सुरुवात ही महाराष्ट्र केसरी सिकंदर शेख यांच्या कुस्तीने होणार आहे.

### अशा प्रकारे रंगणार हा क्रिडासंग्राम..

डोंबिवलीच्या ह.भ. प. संतश्रेष्ठ श्री सावळाराम महाराज क्रिडा संकुलात होणाऱ्या स्पर्धा

1. कबड्डी - ४ ते १२ फेब्रुवारी
2. खो खो - ४,९ ते १२ फेब्रुवारी
3. टेबल टेनिस - ४,९ ते ११ फेब्रुवारी
4. बॅडमिंटनझ्र ९ ते ११ फेब्रुवारी
5. टग ऑफ वॉर - ४ ते ६ फेब्रुवारी
6. स्विमिंग - ४,१० ते ११ फेब्रुवारी
7. बॉक्सिंग - ४ ते ६ फेब्रुवारी
8. कुस्ती - ४ ते ६ फेब्रुवारी
9. मल्लखांब - ४ आणि ५फेब्रुवारी
10. जिमनॅस्टिक - ७ आणि ८फेब्रुवारी
11. बॉक्स क्रिकेट - ४,७ ते १२ फेब्रुवारी

(महत्वाची टीप - लोकसभा क्षेत्रात ८ ठिकाणी साखळी सामने होणार आहेत. (दिवा, कळवा, डोंबिवली पुर्व पश्चिम, कल्याण पूर्व, कल्याण ग्रामीण, उल्हासनगर आणि अंबरनाथ) तर ह.भ. प. संत सावळाराम महाराज क्रीडा संकुल येथे अंतिम सामने होणार आहे.)

मुंब्र्यातील मौलाना अब्दुल कलाम आझाद स्टेडियमवर होणाऱ्या स्पर्धा..

1. ॲथलेटिक्स - ५ ते ७ फेब्रुवारी
2. जिमनॅस्टिक - १०,११ फेब्रुवारी

**पलावा स्टेडियम येथे होणाऱ्या स्पर्धा**

1. फुटबॉल - ५ ते १२ फेब्रुवारी

स्काय प्लाझा डोम हॉल उल्हासनगर येथे होणाऱ्या स्पर्धा...

1. कॅरम - ७ ते ८ फेब्रुवारी
2. चेस - ९ ते १० फेब्रुवारी

अंबरनाथ रायफल अँड पिस्टोल शूटिंग रेंज याठीकाणी होणारी स्पर्धा..

1. रायफल शूटिंग - ९ ते ११ फेब्रुवारी

# पर्वती दर्शन भागात टोळक्याची दहशत

**पुणे :** पर्वती दर्शन परिसरात टोळक्याने दहशत माजवून वाहनांची तोडफोड केली. टोळक्याने एका अल्पवयीन मुलावर कोयत्याने वार केले. याप्रकरणी परस्परविरोधी तक्रारी दाखल करण्यात आल्या असून, दोन्ही गटातील बाराजणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सीता नितीन शेंडगे (वय ३३, रा. शिवराज मित्र मंडळाजवळ, पवर्ती दर्शन) यांनी फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार अल्पवयीन मुलासह श्री देवेंद्र, अजय चव्हाण, सोन्या गेजगे, शुभम अडागळे याच्यासह सातजणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन दिवसांपूर्वी अल्पवयीन मुलाचा शेंडगे यांचा पुतण्या अथर्व याच्याशी वाद झाला होता. मध्यरात्री साडेबाराच्या सुमारास अल्पवयीन मुलगा देवेंद्र, चव्हाण, अडागळे आणि साथीदार शिवराज मित्र मंडळाजवळ आले. त्यांनी कोयते उगारून दहशत माजविली. अथर्व याच्या डोक्यावर कोयत्याने वार करण्याचा प्रयत्न केला. अथर्वने वार चुकविला. घराच्या दरवाजावर कोयता आपटून आरोपींनी शिवीगाळ केली. परिसरातील दुचाकी, टेम्पो, रिक्षांच्या काचा फोडल्या, तसेच बिअरची बाटली रस्त्यात फोडली, असे शेडगे यांनी फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस उपनिरीक्षक मुळीक तपास करत आहेत.

अल्पवयीन मुलाला बांबूने बेदम मारहाण केल्याप्रकरणी परस्परविरोधी तक्रार पवती पोलीस ठाण्यात देण्यात आली आहे. याबाबत अल्पवयीन मुलाने फिर्याद दिली आहे.

# लोहार समाज एकत्रिकरण व संघटन सभा संपन्न

महाराष्ट्रातील सर्व लोहार समाज संघटनांचे एकत्रिकरण व संघटन व्हावे,सर्वांचा यात सहभाग व सहकार्य असावे या उद्देशाने त्यावर चर्चा,विचार विनिमय करण्यासाठी रविवार दिनांक २८ जानेवारी २०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता शासकीय विश्राम गृह (रेस्ट हाऊस) कोर्ट नाका, ठाणे (प.) येथे सभेचे आयोजन करण्यात आले,

लोहार समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी समाजाच्या सर्व संघटना एका छताखाली येणे काळाची गरज आहे, लोहार समाज एकत्रिकरण व संघटन हा विषय अनेक वर्षांपासून चर्चेत आहे, याच अनुशंगाने ठाणे येथे कोकण प्रादेशिक विभागात महाराष्टातील समविचारी लोहार समाजाच्या नियुक्त पदाधिकाऱ्यांच्या उपस्थित सभा घेण्यात आली, याच धतीवर यापुढेही महाराष्ट्रातील प्रत्येक प्रादेशिक विभाग, जिल्हा ठिकाणी एकत्रिकरण सभेचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सामाजिक आस्थेने उपस्थित समाज बांधवांनी जाहीर केले, त्याची जबावदारी घेण्याचे नक्की केले आहे.



अनेक संघटना महाराष्टात कार्यरत आहेत, त्यांचे आपापल्या विभागात सामाजिक हितवर्धक कार्य सुरू आहे, शासनाच्या धोरणात्मक निणर्यामुळे सर्व स्तरातील समाज बांधवांना फायदा मिळवून देण्यासाठी लोहार समाजाच्या कोणत्याही एका संघटने किंवा विविध संघटनांनी वेगवेगळ्या मार्गाने प्रयत्न करण्या ऐवजी याच समविचारी संघटनांच्या नियुक्त अभ्यासू पदाधिकाऱ्यांना एकत्र करून एक राज्य स्तरावर यापूवी विविध मिटिंग दरम्यान गठीत केलेल्या लोहार समाज एकत्रिकरण समन्वय समिती माध्यमातून शासनास आपल्या प्रलंबित मागण्यांचे निवेदन तयार करून लोहार समाज शिष्टमंडळ सह देण्यात येईल,असे सर्वानुमते नक्की केले.

तसेच समन्व्य समिती मार्फत अजून विविध विधायक,सामाजिक विषय मुद्दे उदा. समाज जनगणना, इतर समाज कडून होणारे अत्याचार, दबाव, समाज्याच्या प्रलंबित मागण्या व लोहार समाज समस्या, प्रश्न व अडचणी यावर ही चर्चा विनिमय होऊन त्यावर योग्य मार्ग उपाय कसे करता येतील हे ठरविले आहे.

एकत्रिकरण संदर्भात सहभागी होणाऱ्या कार्य तत्पर इच्छुक लोहार समाज पदाधिकाऱ्यांनी यापूवीही नावे सुचवून नोदवली असून,अजूनही इच्छुकनी आपले सहभाग विनाशर्त नोंदवावे, असे आव्हान सर्वानुमते करण्यात आले, तसेच महाराष्ट्रातील सर्व संघटनांचे एकत्रिकरण कसे असावे, एकत्रिकरणाचे फायदे काय,आणि एकत्रिकरणाचे ध्येय धोरण काय असावे, समन्व्य समिती बाबत त्याचे कामकाज, नियमावली,विषय, मुद्दे या संदर्भात सामाजिक आस्थेने नागपूर, संभाजी नगर, अमरावती, भुसावळ, जालना, पूणे, सातारा, रत्नागिरी, रायगड, ठाणे, मुंबई जिल्हा तालुक्यातील उपस्थित असलेल्या पदाधिकाऱ्यांनी आपले विचार, मते मांडले,

लवकरच लोहार समाजाच्या प्रलंबित विविध मागण्यांचे निवेदन तयार करून महाराष्ट्र शासन आणि केंद्र सरकारला सादर करण्यात येणार आहे,तसेच समस्या, प्रश्न व अडचणी याची ही यादी करून नक्की करूयात असे जाहीर करण्यात आले, या मागील एकच उद्देश लोहार समाज बांधवांना लवकरात लवकर न्याय मिळावा,त्यांचे असणारे वेगवेगळे प्रश्न सुटावेत म्हणून महाराष्टातील लोहार समाजाच्या सर्व संघटनांचे एकत्रिकरण होणे आवश्यक असल्याचे मान्यवरांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सामाजिक प्रबोधन केले,

आपले ध्येय एकच असावे समस्त लोहार समाजाचे एकत्रिकरण व्हावे हे बोध वाक्य ठरविण्यात आले, या सभेचे आयोजन महाराष्टातील लोहार समाजाच्या संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी केले होते, तरीही या सभेचे यजमान ठाणे शहर तालुका कमिटी होती, या सभेसाठी खालील समाज बांधव सामाजिक एकनिष्ठेने उपस्थित होते, श्री. दिलीप वसव, श्री. शंकर चुरागले, श्री.गंगारामजी विश्वकर्मा, श्री. आण्णासाहेब जोशी, श्री. राजेश सोमवंशी, श्री. संजय कोळंबकर, श्री. अमोल माने,श्री. पद्माकर खंडागळे, श्री. राजाराम कळसे, सौ. वृंदावनी कळसे, श्री. राजेश मोरे, श्री. सुनील जाधव, श्री. रामनाथ मोरे, श्री. बळीराम खरे, श्री. अरुण कदम, सौ. अपर्णा कदम, श्री. संदीप मन्वाचार्य, श्री.पांडुरंग सोनटक्के, श्री. अरुण गायकर, श्री. विजय गायकर, श्री .कृष्णकांत खरे, श्री.गणपत कदम, श्री. नरेश चौरे, श्री. सुदाम खारकर, श्री. अनंत उके, श्री. उत्तम बावदाणे, श्री. लक्ष्मण बावदाणे, श्री. पुंडलिक सुयर्वंशी,

त्यानंतर आभार प्रदर्शन होऊन, सुरुची भोजन करून कार्यक्रम समाप्त झाला.

# आज मुंबई -पुणे द्रुतगती मार्गावर वाहतूक ब्लॉक



**मुंबई :** यशवंतराव चव्हाण मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर हायवे ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टीम अंतर्गत गॅन्ट्री बसविण्याचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत (एमएसआरडीसी) मंगळवारी (३० जानेवारी) करण्यात येणार आहे.

मुंबई ते पुणे वाहिनीवर (पुणेकडे जाणारी वाहिनीवर) साखळी क्रमांक कि.मी ६३.००० आणि साखळी क्रमांक कि.मी ७५.२५० येथे दुपारी १२.०० ते २.०० वाजेदरम्यान हे काम करण्यात येणार आहे. त्यामुळे गॅन्ट्री बसविताना या कालावधीत पुणे वाहिनीवरील सर्व प्रकारच्या हलक्या आणि जड अवजड वाहनांची वाहतूक पूर्णतः बंद करण्यात येणार आहे. तर मुंबई ते पुण्याकडे जाणारी वाहने साखळी क्रमांक कि.मी ५४.४०० येथून कुसगाव टोलनाका येथून सर्व प्रकारची वाहने राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ (जुना मुंबई-पुणे मार्ग) मार्गाने पुणेबाजूकडे वळविण्यात येतील.

मुख्य *संपादक : नरेश विठ्ठल देसाई हे दैनिक राजदंड मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राणे प्रकाशन प्रा. लि., सर्व्हे नं. १२९, हिस्सा नं. ११ / २ आणि १ / १३, वारजे पुणे - ४११ ०५८ येथे मुद्रित करून न्याती ग्रँडीयर, १०२ ग्रीनविच, कडनगर, उंड्री, पुणे -४११ ०६० येथून प्रकाशित केले. दैनिक राजदंडमधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. (*पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी) दूरध्वनी : पुणे (०२०)२६९०९०३१, इमेल-rajdand.pune@gmail.com
या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या लेख, बातम्या, जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयीन कक्षेत सोडविले जातील.

# माणिक चमन वाणाच्या द्राक्ष बागांवर कुऱ्हाड

**पुणे/ रमेश जाधव**

माणिक चमन वाणाच्या द्राक्ष बागांवर शेतकऱ्यांकडून कुऱ्हाड चालवली जात आहे . नवीन वाणाच्या द्राक्षांमुळे बाजारातील कमी झालेल्या मागणीमुळे गेल्या काही वर्षापासून शेतकऱ्यांना अपेक्षित उत्पन्न मिळत नसल्याची स्थिती आहे . त्यामुळे द्राक्ष बागा तोडण्याची वेळ आल्याचे शेतकरी सांगत आहेत .

पुणे जिल्ह्यात आंबेगाव ,जुन्नर त्याचबरोबर बारामती , इंदापूर तालुक्यात माणिक चमन द्राक्षांच्या बागा आहेत या तालुक्यातील शेतकरी माणिक चमन वाणाची द्राक्षाची पीक घेत असतात . मात्र यंदा माणिक चमन वाणाच्या द्राक्षांना वाईट दिवस आले आहेत . या प्रकारच्या द्राक्षांना बाजारात बाजारभावच उपलब्ध नसल्याने अनेक शेतकऱ्यांनी बागा तोडण्याचा निर्णय घेतला आहे .सध्या द्राक्ष बागांवर कोयता चालवला जात असून शेतकऱ्यांना माणिक चमन वाणाच्या द्राक्षांचे पीक परवडत नसल्याचे शेतकरी वर्गातून सांगण्यात येत आहे .

चालू वर्षी द्राक्षांना अपेक्षित बाजारभाव नसल्याने शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले आहे . माणिक चमन वाणाच्या तुलनेत कळमजंबो द्राक्षांना बऱ्यापैकी बाजार भाव असल्याचे द्राक्ष उत्पादक शेतकरी साहेबराव पाटील यांनी सांगितले . काळ्या द्राक्षांच्या तुलनेत पांढऱ्या द्राक्षांना कमी बाजारभाव मिळत आहे .वातावरणातील बदल मान्सूनोत्तर पाऊस याचा द्राक्ष बागांवर परिणाम झाला आहे .माणिक चमन या वाणाचे मनी गोलाकार असल्याने लांब मण्याच्या तुलनेत गोल मण्याच्य द्राक्षांना कमी बाजार भाव मिळतो ही द्राक्षे स्थानिक बाजारात विकली जात नाही . त्यांना केवळ २० ते ३० रुपये प्रति किलो दर मिळत आहे त्या तुलनेत काळ्या द्राक्षांना बऱ्यापैकी मागणी आहे .

दरम्यान काही द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांनी आपल्या द्राक्ष बागांवर कुऱ्हाड चालवली . सतत कमी दर मिळत असल्याने उत्पादन खर्च व उत्पन्नाचा मेळ जमवणे अवघड झाले आहे. पांढऱ्या वाणातील सुपर सोनाका ,एसएसएन वाणाच्या द्राक्षांना बऱ्यापैकी दर आहे . मात्र माणिक चमन वाणाची द्राक्षे बाजारात विकली जात नाही . किंबहुना त्यांचा खप होत नसल्याचे शेतकरी साहेबराव पाटे यांनी सांगितले .

# मुलांच्या सतकर्तेमुळे निराधार आजींना मिळाला हक्काचा निवारा

**पुणे :** खराडी पुणे येथील महाविद्यालयात सोशल फामसी या विषयांतर्गत घेण्यात आलेल्या फील्ड व्हीजटच्या दरम्यान विद्यार्थ्यांनी एका वृद्धाश्रमा ला दिलेली भेट ठरली एका निराधार आजी साठी निवाऱ्याची सोय.

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या शंकरराव उरसळ कॉलेज ऑफ फामसी डिप्लोमा महाविद्यालयाचे विद्याथी मंदार पठारे,यश पठारे, सुकृत निकम,हंसिका राठोड महाविद्यालयात येत असताना त्यांना एक आजी रस्त्याच्या कडेला रडत असलेल्या दिसल्या.मुलांनी आजी बाईंची चौकशी केल्यावर मुलांना त्यांनी माझी कुठे तरी राहण्याची सोय करण्याची विनंती केली आणि मुलांना आजीची सर्व परिस्थिती पाहून खूपच वाईट वाटले.या परिस्थितीत मुलांना नुकत्याच भेट देऊन आलेल्या वृद्धाश्रमाची आठवण झाली आणि त्यांनी लगेच दूरध्वनी करून एन.एस.एस.अधिकारी प्रा.प्रियंका बोरुडे यांना सर्व कल्पना दिली.मॅडमने लगेच कॅब बुक करून या आजीना माहेर वृद्धाश्रमात दाखल केले आणि आजीना एक हक्काचा निवारा मिळवून दिला . शैक्षणिक जीवन जगत असताना आपण समाजाचे काही देणे लागतो याची जाणीव ठेऊन विद्यार्थ्यांनी उचलले पाऊल नक्कीच कौतुकास्पद आहे.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सचिन कोतवाल यांनी सर्व विद्यार्थ्यांचे आणि प्रा. प्रियंका बोरुडे यांचे कौतुक केले आणि त्यांनी केलेल्या या विधायक कामासाठी शुभेच्छा दिल्या.

# डॉ. नेताजी जाधव यांना 'मोस्ट ट्रस्टेड डाएट अँड फिटनेस कन्सल्टंट ऑफ द इयर' पुरस्कार




**पुणे :** भारती विद्यापीठचे क्रीडा आणि शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख डॉ. नेताजी जाधव यांना 'अमिनंट रिसर्च, मुंबई' या संस्थेतर्फे दिला जाणारा ' विश्वसनीय आहार आणि व्यायाम तज्ञ 'हा पुरस्कार मिळाला.प्रसिद्ध चित्रपट अभिनेत्री पद्मिनी कोल्हापुरे यांच्या हस्ते नुकतेच मुंबई येथे या पुरस्काराचे वितरण करण्यात आले.

डॉ. नेताजी जाधव हे गेली २१ वर्षे क्रीडा आणि फिटनेस या क्षेत्रामध्ये काम करत आहेत. त्यांनी भारतीय खेळ प्राधिकरणाच्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ स्पोर्ट्स(पटियाला, पंजाब) येथून फिटनेस, स्पोर्ट्स कोचिंग आणि आणि स्पोर्ट न्यूट्रिशन या विषयांमध्ये पदवी प्राप्त केली आहे. तसेच त्यांनी 'खेळाडूसाठी आहार आणि व्यायाम' या विषयामध्ये पी.एच.डी केली आहे. त्यांनी आतापर्यंत खेळाडूसाठी आहार आणि व्यायाम, वजन कमी करण्यासाठी आहार आणि व्यायाम, मधुमेही लोकांसाठी आहार आणि व्यायाम अशा अनेक विषयांमध्ये विविध आंतरराष्ट्रीय जर्नल्स मध्ये २१ हून अधिक शोधनिबंध प्रकाशित केले आहेत. त्यांनी आतापर्यंत पाच हजार हून अधिक खेळाडूंना संतुलित आहार आणि शास्त्रशुद्ध व्यायाम याविषयी प्रशिक्षण आणि मार्गदर्शन केले आहे.

तसेच पाच हजार हून अधिक सवर्सामान्य लोकांना शास्त्रशुद्ध व्यायाम आणि संतुलित आहार याद्वारे मधुमेह नियंत्रणात आणणे, शरीरातील चरबीचे प्रमाण कमी करणे, शरीरातील स्नायूंना सुदृढ बनविणे, रक्तातील कोलेस्ट्रॉलची आणि चरबीची पातळी कमी करणे, लहान मुलांमधील स्थूलत्व यासाठी मार्गदर्शन केले आहे व या सर्व विषयांमध्ये अनेक ठिकाणी व्याख्याने दिली आहेत.

# २ फेब्रुवारी रोजी 'राष्ट्रीय कीर्तन' कार्यक्रम

## भारतीय विद्या भवन, इन्फोसिस फाऊंडेशनचा सांस्कृतिक प्रसार उपक्रम

**पुणे :** भारतीय विद्या भवन आणि इन्फोसिस फाऊंडेशनच्या सांस्कृतिक प्रसार उपक्रमांतर्गत ह.भ.प.चारुदत्त आफळे यांच्या ' राष्ट्रीय कीर्तन' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. 'राममंदिर ते राष्ट्रमंदिर'असा या कीतर्नाचा विषय आहे.

हा कार्यक्रम शुक्रवार,२ फेब्रुवारी २०२४ रोजी सायंकाळी ६ वाजता भारतीय विद्या भवनचे सरदार महादेव बळवंत नातू सभागृह,(सेनापती बापट रस्ता) येथे होणार आहे.त्यांना प्रसाद करंबेळकर(तबला), सौ. रेशीम खेडकर (हार्मोनियम) हे साथसंगत करणार आहेत. हा कार्यक्रम विनामूल्य आहे.भारतीय विद्या भवन आणि इन्फोसिस फाऊंडेशनच्या सांस्कृतिक प्रसार कार्यक्रमांतर्गत सादर होणारा हा १९३ वा कार्यक्रम आहे.भारतीय विद्या भवनचे मानद सचिव प्रा.नंदकुमार काकिर्डे यांनी ही माहिती दिली.

# मानवरहित विमान प्रणाली आणि ड्रोन तंत्रज्ञान' विषयावर प्रशिक्षण शिबीर

## भारती विद्यापीठ अभियांत्रिकी महाविद्यालयातर्फे आयोजन






पुणेः भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाच्या अभियांत्रिकी महाविद्यालयातर्फे 'मानवरहित विमान प्रणाली आणि ड्रोन तंत्रज्ञान'या विषयावर मार्गदर्शन,प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते .या विषयावर प्रत्यक्ष अनुभव देणारे सत्रही आयोजित करण्यात आले होते.शिबिराचे उद्घाटन सी-डॅक चे वरिष्ठ संचालक संजीवन जी.,भारती विद्यापीठ चे कुलगुरू डॉ.विवेक सावजी,सी-डॅकचे सहसंचालक डॉ. शिवकुमार,सहसंचालक कौशल शर्मा,तंत्र अधिकारी हषर्दा देशपांडे,अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. विदुला सोहनी,उपक्रम प्रमुख डॉ. दीपक बनकर,फॅकल्टी कॉर्डिनेटर स्नेहल चौधरी,सुदर्शनी अब्बड यांच्या उपस्थितीमध्ये झाले.या कायर्शाळेमध्ये ८० विद्यार्थ्यांनी ,विभागप्रमुख आणि प्राध्यापकांनी सहभाग घेतला.

यावेळी बोलताना संजीवन जी. म्हणाले,'सरकार मोठ्या प्रमाणावर ड्रोन तंत्रज्ञानाच्या संशोधनावर खर्च करीत आहे.प्रोत्साहन देत आहे.सर्व क्षेत्रातील विस्तार पाहता मानवरहित विमान आणि ड्रोन तंत्रज्ञानाला तरुण आणि कल्पक बुद्धीमान व्यक्तींची आवश्यकता आहे.विद्यार्थ्यांना त्यात संशोधनाच्या अनेक संधी आहेत'. डॉ.शिवकुमार म्हणाले,'सेवा क्षेत्रात ड्रोन उपयुक्त असून रोजगार आणि अर्थार्जनाच्या मोठ्या संधी निर्माण होत आहेत.त्यात सरकारची धोरणे पूरक आहेत.दरवषी ड्रोन निर्मिती क्षेत्र १० टक्क्यांनी वाढत आहे.१० लाख व्यक्तींना त्यात रोजगार प्राप्त होणार आहे.

'या मार्गदर्शन शिबिरातील गुणवान विद्यार्थ्यांना संशोधन प्रकल्पांमध्ये संधी दिली जाईल',असे कौशल शर्मा यांनी सांगितले. कुलगुरू डॉ.विवेक सावजी म्हणाले,'विद्यार्थ्यांनी अशा शिबिरातून अभ्यासक्रमाच्या पलीकडचे ज्ञान आणि कौशल्ये प्राप्त करावीत.प्रचलित प्रवाहांना समजून घ्यावे.आणि संशोधनावर भर द्यावा.'डॉ.विदुला सोहोनी म्हणाल्या,'विमानरहित विमान आणि ड्रोन तंत्रज्ञान योग्य दिशेने प्रवाहित करण्यासाठी प्रत्यक्ष अनुभव देणारे सत्र उपयुक्त ठरले आहे.याविषयी परस्पर सहकार्य करार करण्यात आले असून त्यामुळे प्रशिक्षण आणि जागृती विषयक उपक्रम केले जाणार आहेत'.

# लासलगाव बाजार समितीत कांदा लिलाव बंद पाडले

**नाशिक :** केंद्र सरकारच्या कांदा निर्यात बंदीच्या निषेधार्थ सोमवारी संतप्त शेतकऱ्यांनी घोषणाबाजी करत लासलगाव बाजार समितीत लिलाव बंद पाडले. मागील आठवड्याच्या तुलनेत कांदा दरात पुन्हा २०० रुपयांनी घसरण झाली. सरकारच्या निणर्यामुळे शेतकऱ्यांचे १० हजार कोटींचे नुकसान झाले आहे. त्यामुळे सात डिसेंबरपासून झालेल्या विक्रीत दोन हजार रुपये प्रति क्विंटल दरातील फरक म्हणून देण्याची मागणी आंदोलकांनी केली. संपूर्ण राज्यात ठिकठिकाणच्या बाजार समितीत लिलाव बंद पाडून केंद्र सरकारचा निषेध केला जाणार असल्याचे महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेने म्हटले आहे.

संघटनेचे संस्थापक अध्यक्ष भारत दिघोळे यांच्या नेतृत्वाखाली सकाळी शेतकऱ्यांनी विंचूर उपबाजारात घोषणाबाजी केली. नंतर शेतकरी लासलगाव या कांद्याच्या सर्वात मोठ्या बाजार समितीत धडकले. लिलाव बंद पाडण्यात आले. मागील आठवड्यात कांद्याला सरासरी १३५० रुपये दर मिळाले होते. सोमवारी सकाळच्या सत्रात ते सुमारे २५० रुपयांनी घसरून ११०० रुपयांवर आले. या दिवशी पहिल्या सत्रात साधारणतः १४ हजार क्विंटलची आवक झाली होती. आंदोलनामुळे एक ते दीड तास लिलाव ठप्प झाले.

केंद्र सरकारने निर्यातीवर बंदी घातल्यापासून कांद्याचे दर कमालीचे गडगडले. शेतकऱ्यांना क्वचितप्रसंगी मिळणाऱ्या उत्पन्नावर पाणी फेरले गेले. सरकारच्या कार्यपध्दती विरोधात शेतकऱ्यांनी संताप व्यक्त केला. कांदा बंदीच्या निणर्याने शेतकऱ्यांचे तब्बल १० हजार कोटींचे नुकसान झाल्याचा अंदाज आहे. भरपाईसाठी शेतकऱ्यांना प्रतिक्विंटल दोन हजार रुपये दरातील फरक म्हणून देण्याची आवश्यकता दिघोळे यांनी मांडली. कांद्यावरील निर्यातबंदी तातडीने उठवावी, अशी मागणी करण्यात आली. लासलगावप्रमाणे लिलाव रोखण्याचे आंदोलन सोलापूर, पुणे, नगर, धुळे असे सर्वत्र करून सरकारचा निषेध केला जाणार असल्याचे आंदोलकांनी म्हटले आहे.

तासाभरानंतर लिलाव पूर्ववत

या आंदोलनामुळे सुमारे तासभर कांदा लिलाव बंद होते. शेकडो शेतकरी माल घेऊन बाजारात आले होते. त्यांच्या आग्रहावरून नंतर लिलाव पूर्ववत करण्यात आल्याचे बाजार समितीने म्हटले आहे. निर्यात बंदी विरोधात शेतकरी ओरड करत आहेत. ही बाब सरकारपर्यंत पोहोचण्यासाठी आंदोलनाचा मार्ग स्वीकारण्यात आल्याचे दिघोळे यांनी सांगितले. पुढील काळात लिलाव बंद पाडण्याबरोबर रास्ता रोको व रेल रोकोसारखे आंदोलन केले जाईल, असे त्यांनी सूचित केले.

# खेड तालुक्यात आढळराव पाटील यांच्या हस्ते विकास कामांचे उदघाट्न



**राजगुरूनगर :** खेड तालुक्यात विविध विकासकामांचे उदघाटन खेड तालुक्यातील विविध गांवामध्ये विविध विकासकामांचे उदघाटन माजी खासदार व शिवसेना उपनेते शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या हस्ते झाले.

सत्तेत नसतानाही मतदारसंघात मुख्यमंत्री यांच्या माध्यमातून भरपूर विकासकामे केली असल्याचे आढळराव यांनी सांगितले. मी खासदार अमोल कोल्हे सारखा मतदार संघातून गायब झालो नाही. जनतेच्या सतत संपर्कात राहिलो. यावेळी नितीनभाऊ गोरे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक विजय शिंदे, राजू जवळेकर, प्रकाश वाडेकर, विशाल पोतले, धनंजय पठारे, सरपंच माधुरी खेसे, माजी सरपंच राणी डुंबरे पाटील, संभाजी घारे, सुरेश डुंबरे, अनिल नेटके, उपसरपंच संतोष सातपुते, पोलीस पाटील आत्माराम डुंबरे, मारूती बोत्रे , ग्रा. पं. सदस्या पुष्पा होरे, धनश्री कान्हुरकर आणी ग्रामस्थ हजर होते. सुरेश डुंबरे पाटील यांनी सूत्रसंचालन केले. संभाजी घारे यांनी प्रास्ताविक केले तर विजयसिंह शिंदे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# ठाण्यातील एस. टी. सेवानिवृतांची निदशर्ने

**ठाणे :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ठाणे विभागातील सेवानिवृत्त कमर्चारी सोमवार दिनांक २९ जानेवारी २०२४ रोजी आपल्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी ठाण्यातील विभाग नियंत्रक कार्यालयासमोर सरचिटणीस सदानंद विचारे यांच्या नेतृत्वाखाली एक दिवसीय निदशर्ने करून आपला निषेध व्यक्त केला..

जवळपास ३२ हजारांहून अधिक सेवानिवृत्तांची पेन्शन एसटी महामंडळाने प्रशासकीय शुल्क न भरल्यामुळे अद्याप सुरू झालेली नाही, ती तात्काळ सुरु करण्यात यावी. भारत सरकारच्या नवीन पेन्शन योजनेचा लाभ सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना मिळण्यात एस. टी. महामंडळाच्या अधिकाऱ्यांच्या आडमुठ्या धोरणामुळे विलंब होत आहे.

सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना एसटी च्या सर्व प्रकारच्या गाड्यांमध्ये वर्षभरासाठी मोफत प्रवास पास मिळावा. कामगार करारातील तरतुदीनुसार सेवानिवृत्तां साठी दवाखान्याची सोय करणे. सेवनिवृतांच्या मुलांना नोकरीत ५ टक्के आरक्षण मिळावे. तसेच वैद्यकीय बिलांची परिपुती करण्यात यावी. या महत्वपूर्ण मागण्यां साठी ठाण्यातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी विभाग नियंत्रक कार्यालयासमोर निदशर्ने केली ..या आंदोलनात ठाण्यातील बहुसंख्य सेवानिवृत्त कमर्चारी उपस्थित होते..



# पुणे शहर रिपाइंचा पुणे जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा




**हडपसर /पुणे :** संविधान बनविण्यास डॉ. बाबासाहेबांच्या पेक्षा पंडीत जवाहरलाल नेहरु यांचे योगदान जास्त आहे. डॉ. बाबासाहेबांनी केवळ संविधानाचे लेखन करण्याचे काम केले आहे. असे वादग्रस्त वक्तव्य सुधिंद्र कुलकणी यांनी केले आहे. असे वक्तव्य डॉ. बाबासाहेबांचा अवमान करणारे व संविधानाचे महत्व कमी करण्याचा हेतु आहे. डॉ. बाबासाहेबांचा अवमान असुन ,जातीयवादी कुलकणी याच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा यासाठी रिपब्लिकन पाटी ऑफ इंडिया (आठवले) पुणे शहरांच्या वतीने रिपाइं पुणे शहर अध्यक्ष संजय सोनवणे यांच्या नेतृत्वात पुणे जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला.

मोर्चा डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापासून जिल्हाधिकारी कार्यालय गेट समोर घोषणाबाजी करीत जाहिर निषेध करण्यात आला. सुधिंद्र कुलकणी यांच्यावर कायदेशीर गुन्हा दाखल करुन अटक करण्यात यावी अशी मागणी करत पुणे जिल्हाधिकारी यांना रिपाइं शिष्टमंडळाने निवेदन दिले.

महिलां व कार्यकर्त्यांनी सुधिंद्र कुलकणी यांच्या पोस्टरला चपलानी मारत प्रतिमेस आग लावून निषेध केला.

मोर्चात रिपाइं महाराष्ट्र प्रदेश सचिव बाळासाहेब जानराव, माजी उपमहापौर सिध्दार्थ धेंडे, पश्चिम महाराष्ट्र युवक अध्यक्ष परशुराम वाडेकर, माजी शहर अध्यक्ष अशोक कांबळे, अशोक शिरोळे, रिपाइं प्रदेश सचिव यशवंत नडगम, मंदार जोशी,विरसेन साठे,माजी उपमहापौर सुनिता वाडेकर, पश्चिम महाराष्ट्र महिला अध्यक्षा शशीकला वाघमारे, पश्चिम युवक कार्याध्यक्ष निलेश आल्हाट,बसवराज गायकवाड, शाम सदाफुले, आप्पासाहेब वीडेकर,संतोष खरात, हडपसर अध्यक्ष महादेव दंदी, चिंतामण जगताप, मिना गालटे, सुनिता वाघमारे,मिनाज मेमन,मलखेसिंग दुधाणी,सुरज जाधव सह रिपाइं कार्यकर्ते , महिला उपस्थित होते.

# प्रभू श्री रामचंद्राच्या प्राणप्रतिष्ठानच्या सोहळ्याचे औचित्य साधून गीत रामायण भक्तिमय कार्यक्रम





ठाणे : महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे व कल्याण लोकसभेचे खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे यांच्या संकल्पनेतून प्रभू श्री रामाच्या प्राण प्रतिष्ठापना सोहळ्याचे औचित्य साधून चावंडाई मंदिर, पारसिकनगर येथे महाआरती करण्यात आली. तसेच खारीगाव- पारसिकनगर मधील राम भक्तांसाठी गायक उमेश सुतार यांचा गीतरामायण भक्तीसंगीताचा कार्यक्रम आयोजन करण्यात आले तसेच प्रभू श्री राम चंद्राची एलईडी लाईट असलेल्या प्रतिमेचे उद्घाटन मा. नगरसेवक श्री. उमेश पाटील व शिवसेना नेते दशरथ दादा पाटील, यांच्या हस्ते करण्यात आले त्याप्रसंगी उपमहापौर पल्लवी कदम, कळवा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ निरीक्षक कन्हैयालाल थोरात साहेब, माजी नगरसेवक शाम पाटील, माजी नगरसेवक दिनेश कांबळे, ठाणे शहर संघटक नरेंद्र शिंदे, युवा नेते राकेश पाटील, उपविभागप्रमुख रविंद्र पाटील, विभागप्रमुख विजू शिंदे, गजानन पवार, मनोज पाटील, सचिन पाटील, शाखाप्रमुख राधेय वराडकर, गणेश बोऱ्हाडे,रवी भोईर, रविंद्र जावळे, संदीप पाटील, पूनम पाटील, सुजय पाटील, कुणाल म्हात्रे, समाजसेविका रचना पाटील, सौ. शारदा पाटील, महिला विभाग संघटक अचर्ना पाटील, शाखा संघटक निमर्ला कदम, उपशाखा संघटक रेखा रहाटे, उपशाखा संघटक स्मिता आयरे, उपशाखा संघटक प्रियांका भरम व ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शंकराचार्य निश्चलानन्द सरस्वती तीन दिवस पुण्यात



**पुणे** : जगन्नाथपुरी येथील श्री गोवर्धन पीठाचे प.पू. जगदगुरू शंकराचार्य श्री निश्चलानन्द सरस्वती स्वामी महाराज यांच्या पवित्र दर्शनाचा लाभ पुणेकरांना होणार आहे. महाराजांचे आगमन बुधवार, दि.३१ जानेवारी रोजी सकाळी ९.०० वा. होणार आहे. याच दिवशी दुपारी १२.३० वा. महाप्रसाद व सायं. ५.३० वा. संगोष्ठी व महाप्रसादाचे वाटप होईल. गुरुवार, दि. १ फेब्रुवारी रोजी लॉ कॉलेज रोड येथील शांतीशीला क्रीडा संकुल येथे त्यांच्या वेदयुक्त दर्शन, विज्ञान व व्यवहार या विषयावर धर्मसभेचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम सर्व पुणेकरांसाठी असून महाराजांच्या पवित्र दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक अॅड. सीमा तिवारी यांनी केले. श्री गोवर्धन पीठाच्या आदित्य-आनंद वाहिनीतर्फे कार्यक्रम होणार आहे.

शुक्रवार, दि.२ फेब्रुवारी रोजी स. ११.३० वा. संगोष्ठी, दीक्षा व महाप्रसाद दिला जाईल. त्यानंतर जगद्गुरू शंकराचार्य हे मुंबईला रवाना होतील. दरम्यान तीन दिवस त्यांचा मुक्काम सौ. अवंतिका व श्री. अशिम अशोक पाटील यांच्या शांता रेसिडेन्सी येथे होणार आहे. शांतिशीला सोसायटीचे डॉ. नरेंद्र वैद्य, हेमंत येरवडेकर, वासंती पुरोहित यांच्यासह विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाची पूर्वतयारी केली आहे. येथे राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, आध्यात्मिक, उद्योग-व्यवसाय क्षेत्रातील मान्यवर ऊत्स्फूर्तपणे सहभागी होत आहेत. अशी माहिती संस्कृतचे गाढे अभ्यासक पं. वसंत गाडगीळ यांनी दिली.

# पर्यावरणपूरक पर्यटनाला चालना देणार -गिरीश महाजन

**मुंबई** : ग्रामीण पर्यटनाचा विकास करून शाश्वत विकासाकडे वाटचाल करण्याची शपथ पर्यटन मंत्री गिरीश महाजन यांनी मुंबई फेस्टिव्हल २०२४ समारोपप्रसंगी सर्वांना दिली. पर्यावरणपूरक पर्यटनाला चालना देण्यासाठी आपण सर्वांनी मिळून प्रयत्न करू, असे आवाहन पर्यटन मंत्री महाजन यांनी केले.




राज्य शासनाचा पर्यटन विभाग आणि मुंबई फेस्टिव्हल समितीमार्फत मुंबई फेस्टिव्हल २०२४ मुंबई येथे २० ते २८ जानेवारी दरम्यान सुरू होता. या फेस्टिव्हलचा समारोप एमएमआरडीए मैदान क्र. ५ व ६ वांद्रे येथील महा मुंबई एक्सापो प्रदर्शनामध्ये 'कॉन्सर्ट फॉर चेंज' या कार्यक्रमाने झाला. त्यावेळी मंत्री महाजन बोलत होते.

या कार्यक्रमाला मुंबई फेस्टिव्हल सल्लागार समितीचे अध्यक्ष आनंद महिंद्रा, अप्पर मुख्य सचिव भूषण गगराणी, संयुक्त राष्ट्र संघाचे स्थानिक सचिव शोभा शहा, पर्यटन सचिव जयश्री भोज, पर्यटन संचालक डॉ. बी. एन. पाटील, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक श्रद्धा जोशी-शर्मा, संयुक्त राष्ट्रसंघाच्या सदिच्छा दूत अभिनेत्री दिया मिर्झा, पर्यटन सदिच्छा दूत नवेली देशमुख यावेळी उपस्थित होते.

मंत्री महाजन म्हणाले की, पर्यावरणपूरक पर्यटनाला चालना देण्याबरोबरच रोजगार निर्मितीही उपलब्ध होणार आहे. अनेक देशांची अर्थव्यवस्था पर्यटनावर आधारित आहे. जास्तीत-जास्त रोजगार निर्माण करण्यासाठी पर्यटनाला चालना देणार असून राज्याला ७२० किलोमीटर लांबीचा विस्तीर्ण आणि निसर्गरम्य लाभलेला समुद्रकिनारा लाभला असून, ऐतिहासिक गड किल्ले, अजिंठा, वेरूळ येथील जगप्रसिद्ध लेणी, जैवविविधतेने समृद्ध वने, तेथील वन्य प्राणी, धार्मिक स्थळे लाभली आहेत. त्यामुळे महाराष्ट्रात पर्यटन विकासाला मोठी संधी आहे. पर्यटन क्षेत्राला चालना देण्यासाठी विविध उपक्रम राबविले जात असून त्याचाच एक भाग म्हणून मुंबई फेस्टिव्हल २०२४ हा आनंद महिंद्रा यांच्या अध्यक्षतेखाली उत्कृष्टपणे राबवला गेला. पुढील वर्षीही यापेक्षा अधिक चांगले कार्यक्रम फेस्टिव्हलमध्ये आयोजित करण्यात येतील, असेही ते म्हणाले.

ते पुढे म्हणाले की, धकाधकीच्या जीवनात आनंदाचे क्षण मिळावेत, हीच या महोत्सवाच्या आयोजनामागील भूमिका आहे. या उत्सवाचा प्रत्येकाने आनंद घेतला पाहिजे. त्यासाठी या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यामुळे मुंबईतील पर्यटन क्षेत्राला चालना मिळणार आहे.

# ज्येष्ठ व्यंगचित्रकार प्रभाकर झळके यांचा सत्कार

**नाशिक:** १९८३ साली शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसेना भवन येथे स्थापन केलेल्या व्यंगचित्रकारांची संस्था कार्टूनिस्ट्स कंबाईन आणि जगदंबा शिक्षण संस्था, येवला, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने येवला येथील ज्येष्ठ व्यंगचित्रकार प्रभाकर झळके यांचा भव्य सत्कार आयोजित करण्यात आला होता. यावेळी महाराष्ट्रातील अनेक दिग्गज व्यंगचित्रकार उपस्थित होते. या कार्यक्रमात प्रभाकर झळके यांनी गेल्या साठ वर्षात जमा केलेला दुर्मिळ व्यंगचित्र संग्रह कार्टूनिस्ट्स कंबाईनकडे जाहीरपणे सुपूर्द करण्यात आला.

यावेळी महाराष्ट्रातील असंख्य मोठ्या व्यंगचित्रकारांनी आमच्या शिक्षण संस्थेत यावं आणि आमच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावं हे आमच्या संस्थेच्या कायम लक्षात राहील असे रुपेश दराडे यांनी म्हटले. कोणताही व्यवसाय करा. त्यासोबत एखादी कला शिका. कारण शिक्षण जीवनाला दिशा देते तर कला जीवन कसे जगायचे ते शिकवते. हास्यासारखे दुसरे औषध नसते. आयुष्यात उत्साही आणि तरुण राहायचं असेल तर हसा. त्यामुळे तणाव कमी होऊन जे काम करता त्यात प्रचंड यश मिळतं. कारण हास्याचा आणि मेंदूचा अतिशय जवळचा संबंध आहे. हसण्याची सवय म्हणजे इतरांना हसण्याची नव्हे, माणसाला उत्साही ठेवते असे कार्टूनिस्ट्स कंबाईनचे अध्यक्ष संजय मिस्त्री यांनी म्हटले.



संस्थेचे माजी अध्यक्ष प्रशांत कुलकर्णी म्हणाले,प्रभाकर झळके यांचं व्यक्तिमत्व जसं अतिशय टापटीप आहे तसंच त्यांचं कामही टापटीप असतं. हा टापटीपपणा असेल तर माणूस झळके यांची उंची गाठू शकतो.

कार्टूनिस्ट्स कंबाईनचे अध्यक्ष संजय मिस्त्री, माजी अध्यक्ष प्रशांत कुलकर्णी आणि चारूहास पंडित यांनी तो स्वीकारला. यावेळी ज्येष्ठ व्यंगचित्रकार ज्ञानेश सोनार आणि जगदंबा शिक्षण संस्थेचे संचालक रुपेशभाऊ दराडे यांच्या हस्ते प्रभाकर झळके यांचा सत्कार करण्यात आला. तसेच संस्थेचे प्राचार्य उत्तम जाधव यांनी सुरेख प्रास्ताविक केले. यावेळी हा कार्यक्रम यशस्वी करण्यामागे ज्यांनी रात्रंदिवस प्रचंड मेहनत घेतली त्या मयूर गुजराथी यांचा जाहीर सत्कार आणि कौतुक करण्यात आला. शेवटी अर्कचित्रकार अतुल पुरंदरे यांनी आभार प्रदर्शन केले.

# पनवेलमध्ये दगडखाणीतील ब्लास्टिंगवेळी पोकलेन ऑपरेटरचा मृत्यू

**नवी मुंबई** : पनवेलमधील कुंडेवहाळ येथील अॅन्थोनी भोईर यांच्या दगडखाणीत केलेल्या ब्लास्टिंग दरम्यान उडालेले दगड कामगारांना लागल्याने पोकलेन ऑपरेटरचा मृत्यू, तर इतर दोन कामगार गंभीर जखमी झाल्याची घटना सोमवारी दुपारी घडली. त्यामुळे पनवेल शहर पोलिसांनी ब्लास्टिंग करणाऱ्या विरोधात निष्काळजीपणाचा गुन्हा दाखल केला आहे.

पनवेल तालुक्यातील कुंडेवहाळ येथील अॅन्थोनी भोईर यांच्या दगडखाणीत सोमवारी सकाळी ७ वाजल्यापासून ब्लास्टिंगचे काम सुरू होते. दुपारी २ वाजण्याच्या सुमारास मोठे ब्लास्टिंग केले. त्यातून उडालेले मोठमोठे दगड त्याठिकाणी कामाला असलेल्या कामगारांना लागले. त्यामुळे हेल्पर अंकित-कुमार साह (१८), पोकलेन ऑपरेटर अविनाश कुजुर (३२) व सुपरवायझर सुरेश निरगुडा (२७) हे तिघे गंभीर जखमी झाले. त्यामुळे या तिघांना खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. यात पोकलेन ऑपरेटर अविनाश कुजुर याला पाठीत व पोटात गंभीर दुखापत झाल्याने त्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. पनवेल शहर पोलिसांनी या घटनेला जबाबदार धरून ब्लास्टिंग करणारा कुलामणी राऊत याच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# 'ईडी'चे अतिरिक्त संचालकपदी अमित दुआ

**मुंबई** : २००७ च्या तुकडीचे आयआरएस अधिकारी अमित दुआ यांची 'ईडी'च्या मुंबई विभाग क्रमांक एकचे अतिरिक्त संचालक म्हणून नियुक्ती झाली आहे. दुआ हे मुंबई विभाग क्रमांक दोनचीही जबाबदारी पार पाडणार आहेत. दिल्ली मुख्यालयात असताना त्यांनी आस्थापना व सतर्कता विभागाचे काम कौशल्याने हाताळले होते.

भारतीय महसूल सेवेतील अधिकारी निखिल गोविला यांची बदली नुकतीच दिल्लीला झाली.

# नानक साईच्या घुमान साहित्य सभेचे संत नामदेव साहित्य पुरस्कार जाहीर

## डॉ. सदानंद मोरे, प्रा. फ. मु. शिंदे, निर्मलकुमार सूर्यवंशी, दत्ता डांगे, मनोज बोरगावकरांचा समावेश

**नांदेड** : येथील नानक साई फाऊंडेशनच्या घुमान साहित्य सभेचे संत नामदेव साहित्य पुरस्कार मंगळवारी (दि. ३०) जाहीर करण्यात आले. डॉ. सदानंद मोरे, प्रा. फ. मु. शिंदे, निर्मलकुमार सूर्यवंशी, दत्ता डांगे, डॉ. मनोज बोरगावकर, डॉ. हंसराज वैद्य, देवीदास फुलारी, डॉ. भगवंत क्षीरसागर, शिवा कांबळे, व्यंकटेश चौधरी यांचा आदींचा या पुरस्कारात समावेश आहे.

नानक साई फाऊंडेशनच्या वतीने येत्या रविवारी (दि. ४) नांदेड येथे होणाऱ्या संत नामदेव मराठी साहित्य संमेलनात या पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार असल्याची माहिती घुमान साहित्य सभेचे अध्यक्ष प्रा. डॉ. गजानन देवकर यांनी दिली.

सामाजिक आणि आध्यात्मिक क्षेत्रात अग्रगण्य ठरलेल्या नांदेड येथील नानक साई फाऊंडेशन आणि महाराष्ट्र शासनाच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ साहित्यिक डॉ. जगदीश कदम आणि नानक साई फाऊंडेशनचे प्रमुख पंढरीनाथ बोकारे यांच्या पुढाकाराखाली हे संमेलन नांदेड येथील श्री गुरु ग्रंथ साहिब भवन येथे आयोजित करण्यात आले आहे.

# सुधींद्र कुलकर्णी यांच्याविरुद्ध रिपब्लिकन पक्ष आक्रमक

**मुंबई** : भारतीय संविधानाचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबाबत अवमानजनक वक्तव्य करणाऱ्या सुधींद्र कुलकर्णी यांच्या विरोधात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) मुंबई प्रदेशच्या वतीने आक्रमक भूमिका घेत तीव्र निषेध आंदोलन केले आहे. मुंबईत आझाद मैदान येथे सुधींद्र कुलकर्णी यांचा फोटो जाळून रिपब्लिकन पक्षाने त्यांचा तीव्र निषेध केला. रिपाइंचे राष्ट्रीय सरचिटणीस अविनाश महातेकर, रिपाइंचे मुंबई प्रदेश अध्यक्ष सिध्दार्थ कासारे, सरचिटणीस विवेक पवार यांच्या नेतृत्वात रिपब्लिकन आझाद मैदानात सुधींद्र कुलकर्णी यांचा फोटो जाळून तीव्र निषेध आंदोलन केले. या आंदोलनात रिपाइं चे जिल्हा अध्यक्ष संजय पवार, रमेश



गायकवाड, प्रकाश जाधव, संजय डोळसे, साधु कटके, सुनील मोरे, नंदु साठे, सोना कांबळे, हरिहर यादव, अभया सोनावणे यांनी या आंदोलनात भाग घेतला.

मुंबईत रिपब्लिकन पक्षाने सुधींद्र कुलकर्णी यांचा फोटो जाळल्यानंतर पुण्यामध्ये रिपब्लिकन पक्षाने सुधींद्र कुलकर्णी यांच्या फोटोला जोडे मारो आंदोलन करून तीव्र निषेध केला. यावेळी रिपाइंचे परशुराम वाडेकर, संजय सोनावणे, बाळासाहेब जाणराव, डॉ. धेंडे, मंदार जोशी, शशिकलाताई वाघमारे, निलेश अल्हाड, यशवंत नडगम आदी अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार आहेत. हे सर्व जगाला मान्य आहे मात्र स्वयंघोषित विचारवंत सुधींद्र कुलकर्णी यांनी संविधान निर्मितीचे श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपेक्षा पंडित नेहरूंचे अधिक आहे, असे चुकीचे वक्तव्य करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अवमान केला आहे. सुधींद्र कुलकर्णी यांच्या या वक्तव्यामुळे देशवासीयांच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. सुधींद्र कुलकर्णी हे मूर्खांच्या नंदनवनात वावरत असल्याचे सांगून केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी त्यांचा तीव्र निषेध केला आहे.

# कराड विमानतळाचे विस्तारीकरण वर्षभरात पूर्ण होणार

## पालकमंत्री शंभुराज देसाई यांनी दिली माहिती

**कराड** : एका वर्षात कराड विमानतळाचे विस्तारीकरण आणि रात्रीच्या वेळी विमान सेवा सुरू करणे, याबाबीला प्राधान्य देण्यात आले आहे. यामुळे जिल्ह्यातील पर्यटन, उद्योग वाढीला चालना मिळणार आहे, असे कराड विमानतळाच्या विस्तारीकरणाबाबतच्या आढावा बैठकीत पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी सांगितले.

मंगळवारी दुपारी झालेल्या या बैठकीला जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पोलीस अधिक्षक समीर शेख, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महादेव घुले, उपवनसरंक्षक आदिती भारद्वाज, अप्पर जिल्हाधिकारी जीवन गलांडे, विमानतळ प्राधिकरणाचे विभागीय व्यवस्थापक संतोष नलावडे, उपविभागीय अधिकारी अतुल म्हेत्रे, जलसंपदा विभागाचे अधिक्षक अभियंता जयंत शिंदे आदी उपस्थित होते.

कराड विमानतळ विस्तारीकरण व नाईट लॅंडींग हा विषय अनेक वर्षापासूनचा प्रलंबित आहे. सन २०१२-१३ मध्ये विस्तारीकरणाचा आराखडा तयार करण्यात आला आहे. सध्याची असणारी १ हजार २८० मीटरची धावपट्टी वाढवून ती १ हजार ७०० मीटर करण्यात येणार आहे.

विस्तारीकरणासाठी ४८ हेक्टरचे भूसंपादन झाले आहे. जवळपास ६२ टक्के खातेदारांना भूसंपादन पोटी मिळणारा निधी शासनाने वितरीत केला आहे.



उर्वरित खातेदारांना पंधरा दिवसांची नोटीस देवून भूसंपादनाची भरपाई स्विकारण्याचे आवाहनही पालकमंत्री देसाई यांनी केले.

भरपाईची रक्कम न स्विकारल्यास रकमेचा भरणा कोर्टात करण्यात येवून जमीन ताब्यात घेण्यात येईल व संपादित जमिनीस लवकरात लवकर शासनाचे नाव लावण्याच्या कामास प्राधान्य देण्याचा निर्णय पालकमंत्री देसाई यांच्या अध्यक्षतेखाली या बैठकीत झाला. यावेळी एअरपोर्ट अॅथोरिटी ऑफ इंडिया यांनी निर्धारित केलेल्या नियमानुसार जी बांधकामे, टॉवर्स अडथळा निर्माण करणारी ठरतील ती अतिक्रमणे काढण्याबाबत कारवाई करण्याचे निर्देशही या बैठकीत पालकमंत्री देसाई यांनी दिले.

पाटण तालुक्यात १ हजार ६२ पवनचक्क्यांची नोंद असून उभारण्यात येणाऱ्या प्रत्येक पवनचक्कीची नोंद कटाक्षाने झालीच पाहिजे याबाबत यंत्रणांनी दक्षता घ्यावी. ग्रामपंचायतीने पवनचक्क्यांचे क्रमांक देवून त्याचे जिओ टॅगींग करावे, असे निर्देश पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी यावेळी दिले. पाटण तालुक्यातील ज्या ग्रामपांचायतीच्या हद्दीमध्ये पवनचक्की उभ्या आहेत त्या संबंधित कंपन्याकडून ग्रामपंचायतींना देण्यात येणाऱ्या कराबाबतची आढावा बैठकही याचवेळी पालकमंत्री देसाई यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात झाली.

यावेळी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पोलीस अधिक्षक समीर शेख, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महादेव घुले, अप्पर जिल्हाधिकारी जीवन गलांडे, पाटणचे प्रांत सुनील गाडे, महाउर्जाचे महाव्यवस्थापक शेख, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामपंचायत अर्चना वाघमोळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

# आता मुंबई-कोल्हापूर महालक्ष्मी एक्स्प्रेसला अपघातरोधक डबे

## सुखकर व सुरक्षित प्रवासाची रेल्वेची ग्वाही

**कराड** : कोल्हापूर येथील छत्रपती शाहू महाराज टर्मिनल ते मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसदरम्यान रोज धावणाऱ्या महालक्ष्मी एक्स्प्रेस रेल्वे गाडीला लिंक हॉफमैन बुश (एलएचबी) अपघातरोधक डबे जोडण्यात आल्याने आता या गाडीने प्रवास करणाऱ्या प्रवाशांचा प्रवास यापुढे आणखी सुरक्षित व सुखकर होणार आहे. २५ जानेवारीपासून मध्य रेल्वेने घेतलेल्या या निर्णयाचे प्रवाशांमधून स्वागत केले जात आहे. कोल्हापूर येथील छत्रपती शाहू महाराज टर्मिनस येथे २५ जानेवारी रोजी रात्री रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे तसेच कोल्हापूरचे भाजपचे खासदार धनंजय महाडिक यांच्या प्रमुख उपस्थितीत लिंक हॉफमैन बुश (एलएचबी) अपघातरोधक डबे जोडण्यात आलेल्या महालक्ष्मी एक्स्प्रेसला हिरवा झेंडा दाखवण्यात आला.

मुंबई-महालक्ष्मी एक्स्प्रेस ही गाडी वर्षानुवर्षे मध्य रेल्वेच्या मार्गावरून धावत आहे. या गाडीला पश्चिम महाराष्ट्रातील रेल्वे प्रवाशांची सर्वाधिक पसंती आहे. त्यामुळे या गाडीसह या मार्गावरील सर्वच प्रवाशी एक्स्प्रेस गाड्यांना लिंक हॉफमैन बुश (एलएचबी) अपघातरोधक डबे जोडण्यात यावेत, अशी मागणी रेल्वे प्रवाशी संघटनांसह प्रवाशांकडून होत होती. अखेर या मागणीची दाखल घेत, मध्य रेल्वे प्रशासनाने या गाडीला एलएचबी कोच जोडण्याचा निर्णय घेत त्याची अंमलबजावणी गुरुवारपासून केली. त्यामुळे आता या गाडीला जाताना व येतानाही दोन्ही बाजूंनी एलएचबी अपघातरोधक डबे जोडण्यात आले आहेत.

महालक्ष्मी एक्स्प्रेससाठी दोन २२ डब्यांची एलएचबी रेक जाताना व येताना दोन्ही बाजूंनी जोडण्यात येणार आहे. यामध्ये दोन द्वितीय वातानुकूलित, १२ तृतीय इकॉनॉमी, ४ शयनयान, गार्ड्स ब्रेक व्हॅन आणि एक जनरेटर व्हॅनसह तीन द्वितीय श्रेणीचे अनारक्षित डबे अशी २२ डब्यांची संरचना असणार आहे, असे रेल्वे अधिकाऱ्यांनी सांगितले.

## जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी घेतला साहित्य संमेलन तयारीचा आढावा

# मराठी साहित्य संमेलनात खान्देशी संस्कृती

**जळगाव** : अमळनेर येथे होत असलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अंतिम टप्प्यातील तयारीचा जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी आज आढावा घेतला. रस्त्यांची कामांची पाहाणी करत साहित्य संमेलनाच्या आयोजनात कोणतीही कमतरता राहणार नाही याची दक्षता घेण्याच्या प्रशासनाला व आयोजन समितीच्या पदाधिकाऱ्यांना त्यांनी प्रसंगी सूचना दिल्या.



अमळनेर येथे २ ते ४ फेब्रुवारी कालावधीत ९७ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन होणार आहे. या साहित्य संमेलन तयारी अंतिम टप्प्यात आली असून जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी अमळनेर येथील प्रताप महाविद्यालयात बैठक घेत तयारीचा आढावा घेतला. याप्रसंगी खान्देश शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. अनिल शिंदे, उपाध्यक्ष प्रदीप अग्रवाल, संचालक निरज अग्रवाल, मराठी वाड्मय मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ.अविनाश जोशी, अमळनेर उपविभागीय अधिकारी महादेव खेडकर, पोलीस उपअधीक्षक सुनिल नंदवाळकर, तसेच विविध शासकीय विभागांचे अधिकारी - कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी राज्यसभा सदस्य व्ही. मूरलीधरन यांच्या खासदार निधीतून साहित्य संमेलन स्थळावर सुरू असलेल्या स्वच्छतागृह बांधकाम प्रगतीचा जिल्हाधिकाऱ्यांनी आढावा घेतला. सध्या हे ९० टक्के कामकाज पूर्ण झाले असल्याचे बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी बैठकीत सांगितले. खासदार उन्मेष पाटील, खासदार रक्षा खडसे यांच्या निधीतून साहित्य संमेलन स्थळाकडे जाणाऱ्या रस्त्याचे मजबुतीकरण, डांबरीकरण, कॉंक्रीटीकरण व पेव्हर ब्लॉक बसविण्याचे काम पूर्ण झाले आहे. महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानात संमेलनस्थळाकडे जाणाऱ्या चारही दिशेने जाणाऱ्या व येणाऱ्या रस्त्यांच्या कामांचे मजबुतीकरण, डांबरीकरण, कॉंक्रीटीकरण पूर्ण झाली असल्याची माहिती बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी यावेळी दिली.

महावितरणच्या माध्यमातून करण्यात कामांचाही जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी आढावा घेतला. स्वच्छता, पाणीपुरवठा, पोलीस बंदोबस्त, वाहतूक आराखडा, व्हीआयपी पाहुण्यांसाठी साहित्य संमेलन स्थळी पोहचण्याचा पर्यायी मार्ग, पार्किंग व्यवस्था, अग्निशमन व्यवस्था, हेलिपॅड व्यवस्थेचा जिल्हाधिकाऱ्यांनी आढावा घेतला. प्रत्येकाला नेमून दिलेली जबाबदारी चोखपणे पार पाडण्याच्या त्यांनी सूचना दिल्या. अमळनेर येथे होत असलेल्या ९७ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात खान्देशातील लोककला आणि लोकसंगीत यांचेही सादरीकरण होणार आहे.

विशेष म्हणजे या लोककलांचे सादरीकरण त्या-त्या लोककलांचे तज्ञ व पारंपारिक पद्धतीने सादरीकरण करणारी मंडळे सादर करणार आहेत.

### खान्देशी संस्कृतीचे दर्शन

याच दिवशी सभामंडप क्र. २ कविवर्य ना. धों. महानोर सभागृहात दुपारी १२.३० ते १.३० वा खान्देशी बोलीभाषांवर परिसंवाद आयोजित करण्यात आला असून यात अहिराणी, तावडी, भिल्ली, लेवा गणबोली, गुर्जर या बोलीभाषांचा समावेश करण्यात आला आहे. डॉ. रमेश सूर्यवंशी (अहिराणी), अशोक कोळी (तावडी), डॉ. पुष्पा गावीत (भिल्ली), डॉ. जतीनकुमार मेढे (लेवा गणबोली), डॉ. सविता पटेल (गुर्जर) हे सहभागी होतील. रात्री रात्री ८ ते १० वा. सभामंडप क्र १ खान्देशकन्या बहिणाबाई चौधरी सभागृहात कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या रचनांवर आधारित "अरे संसार संसार" हा सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. यात 'परिवर्तन' गृपतर्फे ज्येष्ठ रंगकर्मी शंभू पाटील, हर्षल पाटील व सहकलाकार सहभागी होतील.

# मागासवर्ग आयोगाकडून मराठा सर्वेक्षणाचा शुक्रवारी आढावा

**पुणे** : मराठा आणि खुल्या प्रवर्गाच्या सर्वेक्षणाचा महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाकडून आढावा घेण्यात येत आहे. त्यानुसार पुणे विभागातील पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर आणि सोलापूर या जिल्ह्यांचा आढावा शुक्रवारी (२ फेब्रुवारी) मागासवर्ग आयोगाचे सदस्य डॉ. ओमप्रकाश जाधव हे घेणार आहेत. सर्वेक्षणाचे कामकाज, येणा[illegible]या अडचणी आणि झालेले काम याबाबतची माहिती या वेळी घेण्यात येणार आहे.

राज्य सरकारने १३ नोव्हेंबर २०२३ रोजी पाठविलेल्या पत्रानुसार महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाकडून मराठा समाजाचे मागासलपेण तपासण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून २३ जानेवारीपासून राज्यभरातील मराठा समाज, खुल्या प्रवर्गाचे सर्वेक्षण घरोघरी जाऊन सुरू करण्यात आले आहे. हे सर्वेक्षण ३१ जानेवारीपर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. मात्र, सुरूवातीचे दोन-तीन दिवस सर्वेक्षणाला असंख्य अडचणी आल्या होत्या. राज्यात एकाच वेळी सर्वेक्षणाची माहिती भरण्यात येत असल्याने तांत्रिक अडचणी येत होत्या. त्यावर आयोग, गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्था, राष्टीय माहिती विज्ञान केंद्र (एनआयसी) यांच्या सहकार्याने तांत्रिक अडचणी सोडविण्यात आल्या आहेत. तरीदेखील काही ठिकाणी अद्याप अडचणी येत आहेत. त्यामुळे सर्वेक्षणाचे काम ३१ जानेवारीपर्यंत पूर्ण होणे शक्य नसल्याने मुदतवाढ मिळण्याची शक्यता आहे.